सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १३ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# दिल्लीत ऑपरेशन टायगर
# डिनर डिप्लोमसीतून शिंदे गटाचं उद्धव सेनेला खिंडार?

## श्रीकांत शिंदेंच्या बंगल्यावर ठाकरेंचे खासदार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नवी दिल्ली**

'ऑपरेशन टायगर' ने महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंपाची चाहुल लागली आहे. उद्धव सेनेला खिंडार पाडण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे अनेकदा समोर आले आहे. मंत्री उदय सामंत यांनी तर उद्धव सेनेचे खासदार, आमदार शिंदे गटात येणार असल्याचे दावोस दौऱ्यातच सांगितले होते.

'ऑपरेशन टायगर' ने महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंपाची चाहुल लागली आहे. एकनाथ शिंदे गटाची ताकद वाढवण्यासाठी आणि मुंबई महापालिका निवडणुकीपूर्वी उद्धव सेनेला 'एक धक्का और दो' चा नारा बुलंद करण्यात आला आहे. माजी आमदार राजन साळवी हे आज शिंदे गोटात येणार आहे. तर दुसरीकडे दिल्लीतून उद्धव सेनेला दोन दिवसांपासून वाईट बातम्यांचे खलिते मिळत आहेत. अगोदरच एकनाथ शिंदे यांचा सत्कार सोहळा ठाकरे सेनेच्या जिव्हारी लागला असतानाच, आता शिंदेसेनेच्या डिनर डिप्लोमसीने त्यांचा बीपी हाय केला आहे.




उद्धव सेनेत मोठ्या घडामोडी घडत आहेत. शिंदेंच्या सत्कार सोहळ्याचे वादळ शमते न शमते तोच उद्धव सेनेला एकामागून एक धक्के बसत आहेत. अर्थात या सर्व प्रकरणाला राजकारणाचा चष्मा लावला तर बरेच काही संकेत मिळतात. त्यातच राजन साळवे यांच्या शिंदे गटातील प्रवेशामुळे अगोदरच थेट मॅसेज पोहचला आहे. आता दिल्लीत ऑपरेशन टायगरची चर्चा रंगली आहे.

बुधवारी एकनाथ शिंदे यांचा महादजी शिंदे यांच्या नावाने पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. हा सत्कार ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आला. त्याचे पडसाद लागलीच महाराष्ट्रात उमटले. विशेष म्हणजे या सत्कार सोहळ्याला उद्धव सेनेचे खासदार संजय दिना पाटील हे उपस्थित असल्याचे समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

नेते आदित्य ठाकरे यांनी सुद्धा संजय दिना पाटील यांच्याबद्दल मोठे वक्तव्य केले आहे. ते कदाचित शरद पवार यांच्या भेटीसाठी गेले असतील, असे ते म्हणाले. काही लोक जय महाराष्ट्र करण्याऐवजी जय गुजरात करत आहेत. जे भ्रष्टाचारी आहेत, ते आता भीतीपोटी तिकडे पळत असल्याचे ते म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे आता ऑपरेशन टायगरला एक प्रकारे बळकटी मिळत आहे.एकीकडे या घडामोडी घडत असतानाच, काल रात्री शिंदे गटाकडून डिनर डिप्लोमसी करण्यात आल्याचे समोर आले आहे. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या घरच्या स्नेहभोजनाला ठाकरेंच्या खासदारांनी उपस्थिती लावली. काल रात्री प्रतापराव जाधव यांच्या घरी सर्वपक्षीय खासदारांना स्नेहभोजन ठेवण्यात आले होते. ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय जाधव, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार भाऊसाहेब वाकचौरे उपस्थित असल्याची माहिती समोर आली आहे.

## आम्ही महाराष्ट्र लुटणाऱ्यांचं, कुटुंब फोडणाऱ्यांचं कौतुक कधीच केलं नाही : आदित्य ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नवी दिल्ली**

राजधानी दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला. हा सत्कार ठाकरे गटाच्या चांगलाच जिव्हारी लागला. खासदार संजय राऊत यांनी काल थेट शरद पवार यांच्यावरच हल्लाबोल केला होता. त्यानंतर आज आमदार आदित्य ठाकरे यांनीही शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. महाराष्ट्र लुटणाऱ्यांचे आम्ही कधीही कौतुक केले नाही असे आदित्य ठाकरे म्हणाले आहेत. आदित्य ठाकरे यांनी आज माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शिंदे गटासह महाविकास आघाडीतील शरद पवार गटावर निशाणा साधला.



ठाकरे पुढे म्हणाले, ज्यांनी महाराष्ट्र लुटला किंवा कुटुंब फोडलं त्यांचं कौतुक आमच्या हातून कधीच होणार नाही. स्वार्थासाठी जे जातात ते जय महाराष्ट्र नाही तर जय गुजरात किंवा जय भाजप म्हणून जात आहेत. कुणी कुणाचं कौतुक करावं हा ज्याचा त्याचा विषय असतो. संजय राऊत यांनी कालच त्यांना उत्तर दिलं आहे. एकनाथ शिंदे यांनी फक्त पक्षच फोडला नाही तर बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाचे नाव आणि चिन्ह चोरण्याचे पाप केले आहे. राज्यातील उद्योग दुसऱ्या राज्यात पाठवण्याचे पाप देखील एकनाथ शिंदे यांनी केले आहे. त्यांचा सत्कार आणि कौतुक केल्यामुळेच यावर टीका झाली असे आदित्य ठाकरे म्हणाले.

## वन खात्यात खांदेपालट! एम. श्रीनिवास राव प्रधान यांची मुख्य वनसंरक्षक पदावर बदली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

राज्याच्या वन खात्यात बुधवारी महत्त्वाचे फेरबदल करण्यात आले. एम. श्रीनिवास राव यांची प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) या पदावर बदली करण्यात आली. आतापर्यंत त्यांच्याकडे उत्पादन व व्यवस्थापन हा विभाग होता. राव यांच्याकडे राज्य निसर्ग पर्यटन मंडळ; नागपूरच्या व्यवस्थापकीय संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार असेल.



प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) या पदाची जबाबदारी विवेक खांडेकर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. आतापर्यंत ते अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) या पदावर होते. खांडेकर यांच्याकडे प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण, पुणे) या पदाचा अतिरिक्त कार्यभार असेल. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक नाशिक) ऋषिकेश रंजन हे आता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन, नागपूर) ही जबाबदारी सांभाळतील.

**इतर झालेल्या बदल्या**

ताडोबा, चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक व क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर यांची बदली चंद्रपूर येथे याच पदावर करण्यात आली. नागपूरचे डॉ. किशोर मानकर हे पेंच व्याघ्र प्रकल्पाचे नवे वनसंरक्षक व क्षेत्र संचालक असतील.

उपसंचालक असलेले प्रभूनाथ शुक्ला यांची बदली ताडोबा व्याघ्र प्रकल्पात वनसंरक्षक व क्षेत्र संचालकपदी करण्यात आली. उपवनसंरक्षक (संशोधन) या पदावर पुणे येथे असलेले आशिष ठाकरे हे आता नवे वनसंरक्षक (संशोधन) म्हणून जबाबदारी सांभाळतील.

**संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात महिलाराज**

बोरीवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वनसंरक्षक व संचालकपदी अनिता पाटील यांची बदली करण्यात आली. मल्लिकार्जुन जी. यांची बदली नाशिक येथे मुख्य वनसंरक्षक म्हणून नाशिक येथे करण्यात आली आहे.

## नवीन आयकर विधेयक लोकसभेत सादर; करदात्यांना मिळणार अनेक फायदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नवी दिल्ली**

गेल्या अनेक दिवसांपासून ज्या विधेयकाची चर्चा सुरू होती, ते नवीन आयकर विधेयक गुरुवारी(१३ फेब्रुवारी) लोकसभेत सादर करण्यात आले. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हे विधेयक सभागृहात मांडले. हे विधेयक लोकसभेच्या निवड समितीकडे पाठवण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. ही समिती पुढील अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी आपला अहवाल लोकसभेत सादर करणार आहे. दरम्यान, विधेयक मांडल्यानंतर सभागृहाचे कामकाज १० मार्चपर्यंत तहकूब करण्यात आले आहे.



नवीन विधेयकाची घोषणा अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी रोजी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात केली होती. तसेच, शुक्रवारी (७ फेब्रुवारी) केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत नवीन आयकर विधेयकाला अंतिम मंजुरी देण्यात आली. दरम्यान, अनेक विरोधी खासदारांनी विधेयक सभागृहात मांडण्यास विरोध केला. अशा गदारोळात अर्थमंत्र्यांनी हे विधेयक सभागृहात मांडले आणि लोकसभा अध्यक्षांना ते सभागृहाच्या निवड समितीकडे पाठवण्याची विनंती केली.

**नवीन कायद्यात काय असणार?**

या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतर हे सहा दशके जुन्या आयकर कायदा १९६१ ची जागा घेईल. पूर्वीचा कायदा विविध सुधारणांनंतर गुंतागुंतीचा बनला आहे. सरकारने प्रस्तावित केलेल्या नवीन कायद्यात आयकर कायदा, १९६१ मध्ये नमूद केलेले मागील वर्ष (FY) शब्द बदलून कर वर्ष करण्यात आला आहे. यासह मूल्यांकन वर्ष (AY) ही संकल्पना रद्द करण्यात आली आहे.

आयकर विधेयक, २०२५ मध्ये ५३६ कलमे आहेत, जी सध्याच्या आयकर कायदा, १९६१ च्या २९८ कलमांपेक्षा जास्त आहेत. सध्याच्या कायद्यात १४ अनुसूची आहेत, तर नव्या कायद्यात १६ पर्यंत वाढ करण्यात आली आहे. नवीन विधेयकात प्रकरणांची संख्या केवळ २३ ठेवण्यात आली आहे. तसेच, पानांची संख्या कमी करून ६२२ वर आणली गेली आहे.

# बुलाते है मगर जाने का नही! शिंदेचे स्नेहभोजन, ठाकरेंना ठसका

## स्नेहभोजनाला जाऊ नये ... फर्मान जारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नवी दिल्ली**

शिवसेना उबाठाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे हे गुरुवारी दिल्ली दौऱ्यावर आहेत. त्यांच्या दिल्ली दौऱ्यापूर्वी बऱ्याच नाट्यमय घडामोडी घडल्या होत्या. या घडामोडींमुळे आदित्य ठाकरे यांनी त्यांच्या पक्षाच्या सगळ्या खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीमध्ये त्यांनी त्यांच्या पक्षाच्या सगळ्या खासदारांना एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या स्नेहभोजनाला जाऊ नये असे फर्मान जारी केले आहे.




आदित्य ठाकरे यांचा दिल्ली दौरा सुरू होण्यापूर्वी स्नेहभोजनावरून बरंच नाट्य घडलं होतं. शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार प्रतापराव जाधव यांनी बुधवारी स्नेहभोजन ठेवलं होतं. या स्नेहभोजनाला ठाकरेंच्या शिवसेनेच्या खासदारांनाही आमंत्रण देण्यात आलं होतं. ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे आणि नागेश आष्टीकर यांनी या स्नेहभोजनाला हजेरी लावली होती. प्रतापराव जाधव हे केंद्रीय आरोग्यमंत्री आहेत. मंत्र्यांनी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाला जाण्यास हरकत काय आहे असा एक सूर ठाकरेंच्या खासदारांकडून ऐकायला मिळत होता. या स्नेहभोजनापूर्वी ठाकरेंचे आणखी एख खासदार संज दिना पाटील हे शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी आयोजित केलेल्या स्नेहभोजनाला उपस्थित होते. आदित्य ठाकरे यांनी फर्मान जारी केल्याच्या काही मिनिटांमध्येच त्यांच्या आदेशांना हरताळ फासण्याची मानसिकता ठाकरेंच्या पक्षाच्या खासदारांची दिसून आली. 'प्रतापराव जाधव जुने सहकारी आहेत. त्यांच्याकडे स्नेहभोजनाला जाण्यासाठी पक्षाच्या परवानगीची गरज नाही.' अशी भूमिका ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय जाधव यांनी मांडली आहे. एकनाथ शिंदे हे ऑपरेशन टायगर राबविणार असल्याची गेल्या काही दिवसांपासून चर्चा आहे.

## राजन साळवींचे विनायक राऊतांवर गंभीर आरोप : उद्धव ठाकरेंची साथ का सोडली, कारण हि सांगितले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार राजन साळवी यांनी आज ठाकरे गट सोडण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. एकनाथ शिंदेंसोबत झालेल्या बैठकीनंतर साळवींनी ठाकरे शिवसेना पक्ष का सोडला, कोणामुळे सोडला याचे कारण सांगितले आहे.

२०२४ चा पराभव माझ्या जिव्हारी लागला असल्याचे साळवी म्हणाले. या निवडणुकीत माझ्या पक्षातीलच नेत्यांनी माझ्या विरुद्ध काम केले. विनायक राऊत हेच माझ्या पराभवाला कारणीभूत आहेत. त्यांच्यामुळे मी पक्ष सोडत आहे, असे साळवी यांनी आज जाहीर केले. विनायक राऊत यांनी माझ्याविरोधात काम केल्याचा गंभीर आरोप साळवी यांनी केला आहे.

सामंत बंधू आणि साळवी वादावरही साळवी यांनी त्यांच्यात झालेला समझोता स्पष्ट केला. एकनाथ शिंदे यांनी



आम्हाला तिघांना सुद्धा समजवून सांगितलं की, ही शिवसेना आपल्याला वाढवायची आहे, यामुळे आमच्यातील वाद मिटविण्यात आल्याचे साळवी म्हणाले. माझ्या मतदारसंघातील माणसांना न्याय द्यायचा असेल तर मला योग्य तो निर्णय घेतला पाहिजे असं मी बोललो होतो, त्यामुळे आता मी योग्य वेळी योग्य निर्णय घेतला आहे, असे ते म्हणाले. कोणत्याही चौकशीला आम्ही घाबरत नाही, तेव्हाही मी घाबरलो नाही. आताही मी घाबरत नाही. चौकशी केली तरी मी सहकार्य करेन आणि मला खात्री आहे मी निर्दोष असेन. जेव्हा निवडणूका असतात तेव्हा आरोप होत असतात, असेही साळवी यांनी स्पष्ट केले.

## ६५ वर्षांवरील रिक्षा चालकांना १० हजार मिळणार
## आनंद दिघे महामंडळाच्या बैठकीत प्रताप सरनाईकांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ मुंबई**

आम्ही कल्याकारी मंडळ निर्माण केलंय. या मंडळाच्या माध्यमातून जे आदर्श रिक्षा चालक आहेत. आम्ही त्यांना पुरस्कार देणार आहोत. पाच वर्षांपूर्वीची नोंदणी असलेले ६५ वर्षांच्या वरिल जे काही रिक्षा चालक आहेत, त्यांना आम्ही प्रत्येकी १० हजार रुपयांचं अनुदान देणार आहोत. याला अनुदान म्हणा किंवा पुरस्कारही म्हणता येईल. हे अनुदान आम्ही एकदाच देणार आहोत. १० हजार पुरस्कार म्हणून एकदाच देणार आहोत. आमच्या डिपार्टमेंटने माहिती काढलीये. आजच्या घडीला राज्यात १४ हजार ३८७ रिक्षालाचक हे ६५ वर्षांवरिल आहेत. त्यांना यावर्षी आम्ही १० हजारांची रक्कम देणार आहोत, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. ते मुंबई पार पडलेल्या आनंद दिघे महामंडळाच्या बैठकीत बोलत होते.

## परळीच्या फौजदारी न्यायालयाने धनंजय मुंडे यांना बजावली कारणे दाखवा नोटीस



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३परळी**

विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवारी अर्ज भरताना खरी माहिती दडविल्याबाबत करुणा मुंडे यांनी दाखल केलेल्या ऑनलाइन तक्रारीच्या अनुषंगाने परळीच्या फौजदारी न्यायालयाने मंत्री धनंजय मुंडे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचा आदेश दिला आहे. याबाबत २४ फेब्रुवारी २०२५ रोजी परळीच्या फौजदारी न्यायालयात सुनावणी होणार असल्याचे तक्रारदाराचे वकील चंद्रकांत ठोंबरे यांनी म्हटले आहे.

मुंडे यांनी परळी विधानसभा मतदारसंघातून दाखल केलेल्या उमेदवारी अर्जासोबतच्या शपथपत्रात पत्नी राजश्री मुंडे आणि ३ मुली तसेच करुणा मुंडे यांच्या २ मुलांचा उल्लेख केला होता. मात्र, करुणा मुंडे यांच्या नावावरील मिळकतीबाबत कुठलाही उल्लेख केला नव्हता.

## संपादकीय ......

# नक्षलींचा बंदोबस्त

लोकशाही देशात कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाला स्थान नाही, हे केंद्र सरकारचे धोरण असून त्याविरोधात सरकारने ठोस पावले उचलल्याचे दिसते. जम्मू-काश्मीरमधील पाकपुरस्कृत कारवाया ठेचून काढल्या जात आहेत. पाकिस्तानने जेव्हा 'पुलवामा' केले, तेव्हा भारताने बालाकोटमध्ये घुसून धडा शिकवला. सर्जिकल स्ट्राईकमुळे पाकची बोलती बंद झाली. बाहेरील देशांकडून भारतविरोधी अतिरेकी कृत्ये केली जातात, त्याचप्रमाणे देशात अंतर्गत दहशतवादही आहे. 'अर्बन नक्षल' नावाची एक जमात असून, ती एनजीओ, एखादी संस्था अथवा बुद्धिवाद्यांच्या परिवेशात जहाल कृत्यांचे समर्थन करत असते किंवा त्यांना साह्य पुरवत असते. काही राजकीय पक्षदेखील हिंसक प्रवृत्तींना पाठबळ देत असावेत, असा सरकारला संशय आहे; मात्र अशांची फिकीर न बाळगता ३१ मार्च २०२६च्या आधी देशातून नक्षलवाद मुळापासून हद्दपार करण्याचा संकल्प केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यापूर्वीच जाहीर केला आहे. आता छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवर ११ महिलांसह ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा करून या दिशेने पुढचे पाऊल टाकण्यात आलेले आहे. या चकमकीत दोन जवान शहीद झाले असले, तरी जवानांनी केलेला पराक्रम कौतुकास्पदच आहे. गडचिरोली जिल्ह्याला लागून असलेल्या छत्तीसगडमधील विजापूर जिल्ह्यात ही चकमक झडली. इंद्रावती राष्ट्रीय उद्यान परिसराला लागून असलेल्या तोडका जंगल परिसरात नक्षलवाद्यांचा तळ असल्याची माहिती मिळाल्यानंतर ६५० सुरक्षा जवानांनी त्या परिसरास वेढा दिला. एवढी मोठी आणि तडफदार कारवाई ही अभूतपूर्वच म्हणावी लागेल. सरकारने अशाप्रकारचा निर्धार दाखवला आणि केंद्र व राज्य सरकारी सुरक्षा यंत्रणांनी समन्वयाने कृती केली, तर नक्षलवाद्यांना नेस्तनाबूत करणे अजिबात कठीण नाही, हेच छत्तीसगडच्या घटनेतून पुन्हा एकदा सिद्ध झाले. मुळात गडचिरोली जिल्ह्यालगत ही कारवाई झाली. गडचिरोलीचे रूपांतर भारताच्या पोलादनगरीत करण्याची घोषणा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गडचिरोलीचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तेथे परकीय गुंतवणूक आणि नवनवीन उद्योग प्रकल्प आकर्षित केले जात आहेत. या उद्योगांतून विकास होणार असून, तरुणांना रोजगार मिळणार आहे. तसे झाल्यास बंदुकीमागे धावणारे हात कमी होणार आहेत. नक्षलवाद्यांना हे मुळीच रुचणारे नाही. कारण, त्यामुळे त्यांची 'दुकानदारी' संपणार आहे. छत्तीसगडमध्येही विकासाच्या अनेक योजना राबवल्या जात असून, आदिवासींचे जीवनमान उंचावण्याचे जोमदार प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे तेथे नक्षलवाद्यांच्या कारवाया उफाळल्याचे दिसून येते. त्यात गेल्या काही वर्षांपासून सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या आक्रमक कारवायांमुळे नक्षलवादी एका राज्यातून दुसर्या राज्यात स्थलांतर करत आहेत. दोन राज्यांच्या सीमांवरील अंतर्गत भागात बैठकाही घेत आहेत. छत्तीसगडमधील मोहिमेत ठार झालेल्या नक्षलवाद्यांकडून प्रचंड प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. जानेवारी २०२५ मध्येच ७० नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले होते. छत्तीसगडमध्ये डिसेंबर २०२३ पासून आतापर्यंत एकूण २८० माओवाद्यांना ठार मारण्यात आले असून, १ हजार माओवाद्यांना अटक करण्यात आली. ९२५ जण शरण आले. बस्तर भागही दहशतवादमुक्त केला जात असून, तेथील नक्षलवाद्यांच्या हालचाली मर्यादित करण्यात सरकारला यश येत आहे. आयटीबीपी, बीएसएफ, सीआरपीएफ यासारख्या सुरक्षा यंत्रणा खांद्याला खांदा लावून तेथे काम करत आहेत. गेल्या १५ वर्षांत 'अतिरेकवाद' कमी होत चालला आहे, ही आनंदाची बाब. नक्षलवाद हा भारताचा सर्वात मोठा अंतर्गत शत्रू आहे, असे भूतपूर्व पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी म्हटले होते. आज माओवादी वा नक्षलवाद्यांचे क्षेत्र छत्तीसगड व महाराष्ट्रातील काही भागांपुरतेच मर्यादित राहिले आहे. आंध्रमधून नक्षलवाद्यांचा केव्हाच पुरता बीमोड करण्यात आला आहे. तेलंगणा, झारखंड आणि बिहारमधील नक्षलवाद्यांचे अस्तित्व नगण्य आहे.२०-२५ वर्षांपूर्वी देशातील २२० जिल्हे नक्षलवादाच्या प्रभावाखाली होते. त्यातील १८० जिल्हे नक्षलवादमुक्त झाले आहेत. ४० पैकी केवळ २० जिल्ह्यांत हिंसाचार सुरू आहे. महाराष्ट्र, ओडिशा व तेलंगणालगतचा दक्षिण छत्तीसगडचा भाग जंगलमय आहे. तेथे सर्वत्र दाट झाडी आहे. वाहतुकीच्या कोणत्याही सुविधा नाहीत. धड रस्ते नाहीत. अनेक ठिकाणी दिवाबत्तीचीही सोय नाही. संपर्काची कोणतीही साधने नाहीत. तेथील लोक अर्थातच खूप गरीब आहेत. अशा ठिकाणी मुक्काम ठोकून, कारवायांची आखणी करणे नक्षलवाद्यांच्या दृष्टीने सोपे असते. स्थानिक गरीब आदिवासी बंदुकीच्या धाकामुळे नक्षलवाद्यांची माहिती पोलिसांना देण्याचे टाळतो; परंतु अशा भागातही नक्षलवादी अधूनमधून बंदुकीचा वापर करून निरपराध लोकांना ठार मारतात, खंडणी उकळतात. हे नक्षलवादी म्हणजे कोणी क्रांतिकारक असून, ते जणू जगाचा व गोरगरिबांचा उद्धार करायला निघाले आहेत, असे मानण्याचे मुळीच कारण नाही. पूर्वी छत्तीसगडमध्ये 'सलवा जुडूम' मोहीम हाती घेण्यात आली होती. नक्षलवादाचा मुकाबला करण्यासाठी स्थानिक आदिवासी तरुणांचा समावेश असलेली ही 'नागरी सेना' होती. काट्याने काटा काढणे, हा त्यामागील हेतू होता.

# मेळघाट व्याघ्र प्रकल्पः आदिवासी महिलांसाठी वातनिर्मितीतून रोजगाराच्या नव्या संधी

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अकोट वन्यजीव विभागातील दोन गावे आणि मेळघाट वन्यजीव विभागातील चार गावांतील स्थानिक आदिवासी महिलांना रोजगार मिळावा यासाठी वातनिर्मिती प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. हा प्रकल्प मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील महिलांच्या सक्षमीकरण आणि उन्नतीसाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे.

**मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे कार्य–** मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य काम वन आणि वन्यजीव यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे आहे. त्याचबरोबर स्थानिक लोकांच्या विकासासाठीही मेळघाट व्याघ्र प्रकल्प नेहमीच प्रयत्नशील असतो. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक, अमरावती यांच्या प्रयत्नातून गेल्या चार ते पाच वर्षांपासून मेळघाट क्षेत्रातील युवक-युवतींसाठी रोजगार निर्मितीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. व्यावसायिक वाहनांचे वाटप, मेळघाट कौशल्य प्रशिक्षण केंद्र, संगणक प्रशिक्षण केंद्र आणि शिलाई मशीन केंद्र सुरू करण्यात आले आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून सुमारे दोन हजार नागरिकांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे.

**वातनिर्मिती प्रकल्पाचा उद्देश–** रोजगार निर्मितीची ही प्रक्रिया पुढे चालू ठेवत मेळघाट क्षेत्रातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी वातनिर्मिती प्रकल्प सुरू करण्यात आला आहे.

**वातनिर्मिती प्रशिक्षण आणि साहित्य वाटप–** मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती आणि गडचिरोली अगरबत्ती प्रकल्प (ऋ-झ) यांच्या संयुक्त विद्यमाने अकोट वन्यजीव विभागातील शहानूर व मलकापूर तसेच मेळघाट वन्यजीव विभागातील वस्तापूर, रामटेक, मलकापूर व सोमवारखेडा अशा सहा गावांतील १२० महिला व युवतींना स्थायी रोजगाराच्या दृष्टीने प्राथमिक स्तरावर वातनिर्मितीचे प्रशिक्षण तसेच आवश्यक साहित्य मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे उपलब्ध करून देण्यात आले आहे. या उपक्रमातून व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील ५०० स्थानिक महिलांना स्थायी रोजगार उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.



**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,अमरावती

**उत्पादन आणि उत्पन्न–** वातनिर्मितीच्या माध्यमातून प्रत्येक महिलेला साधारणपणे ३५० ते ४०० रुपये प्रतिदिन मिळकत होत आहे. तयार मालाचे विपणन गडचिरोली अगरबत्ती प्रकल्पाद्वारे केले जात आहे.

**प्रकल्पाचे फायदे–** या उपक्रमातून स्थानिक आदिवासी महिलांना आर्थिक पाठबळ मिळत आहे, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत होत आहे. तसेच, त्यांची आणि त्यांच्या कुटुंबाची वनावरील निर्भरता कमी होऊन स्थानिक नागरिक वन संवर्धनामध्येही सहभागी होत आहेत.

**प्रकल्पातील सहभाग–** वातनिर्मिती प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक तथा वनसंरक्षक एम. आदर्श रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली अकोट वन्यजीव विभाग, गुगामल वन्यजीव विभाग, सिपना वन्यजीव विभाग, मेळघाट वन्यजीव विभाग, वन्यजीव व संशोधन आणि उपजीविका तज्ज्ञ, मेळघाट व्याघ्र प्रकल्प तसेच क्षेत्रीय वन अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.मेळघाट क्षेत्र स्वयंपूर्ण करण्यासाठी येथील महिला आत्मनिर्भरतेने आणि आत्मविश्वासाने कार्य करीत आहेत. या स्वयंसिद्ध महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी तयार केलेल्या वस्तू खरेदी करून आपणही त्यांच्या आनंदात सहभागी होऊया!

# मका पिकातील लष्करी अळीच्या नियंत्रणाकरिता जैविक उपाय; वाचा सविस्तर

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक–** मका पिकावर अमेरिकन लष्करी अळीचा जवळ जवळ सर्व महाराष्ट्रात कमी अधिक प्रमाणात प्रादुर्भाव आहे. लष्करी अळी मक्यातील पोंगा किंवा कोंब खाते, त्यामुळे ते मक्याचे झाड किंवा मका पूर्णपणे निरूपयोगी होतो.




मका पिकावर प्रादुर्भाव झाल्यास मका पिकाचे क्षेत्र मोडण्या शिवाय किंवा पीक काढून टाकल्या शिवाय पर्याय राहत नाही. त्यामुळे अळीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना करण्यापूर्वी आपल्याला अळीची ओळख आणि नुकसान याबद्दल माहिती असणे गरजेचे आहे.

सद्यस्थितीत पीक अवस्थेनुसार करावयाचे व्यवस्थापन (एकात्मिक कीड नियंत्रण)

१) पिकाचे आठवड्यातून किमान दोन वेळा नियमित सर्वेक्षण केल्यास अळीचा प्रादुर्भाव ओळखणे शक्य होते.

२) अळीच्या सर्वेक्षणासाठी एकरी ५ कामगंध सापळे वापरावे.

३) किडींचे पतंग मोठ्या प्रमाणात आढळून येत असल्यास प्रकाश सापळ्यांचा वापर करून पतंग पकडून व रॉकेल मिश्रीत पाल्यात बुडवून मारावेत.

४) किडींचे अंडीपुंज व जास्तीत जास्त अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात.

५) शेतातील बांध तणमुक्त ठेवावे जेणेकरून प्रमुख पीक उपलब्ध नसल्यास तणावर उपजिविका करणार नाही.

६) पिकाची काढणी लवकर करावी त्यामुळे नंतरच्या हंगामातील किडींच्या प्रादुर्भावातून सुटका होईल.

**जैविक नियंत्रण**

१) रोपे ते सुरूवातीची पोंगे अवस्थेत ५ टक्के पोंग्यामध्ये तसेच १० टक्के कणसामध्ये प्रादुर्भाव आढळल्यास जैविक किटकनाशकांची फवारणी करावी.

२) बॅसीलस थुरिंजिनिसिस व कुर्सटाकी २० ग्रॅम/१० लि. पाणी किंवा ४०० ग्रॅम/एकर याप्रमाणे फवारणी करावी.




रोपे ते सुरूवातीची पोंगे अवस्था

अंड्याची उबवण क्षमता कमी व सूक्ष्म अळ्यांच्या नियंत्रणासाठी ५ टक्के प्रादुर्भाव असल्यास, ५ टक्के निर्बोळी अर्क किंवा ॲझाडिरेक्टीन १५०० पीपीएम, ५० मि.ली. प्रति १० लिटर याप्रमाणे फवारणे.




**मध्यम ते उशिरा पोंगे अवस्था**

१) अळी पोंग्यामधे उपजिवीका करीत असल्यामुळे रासायनिक किटकनाशकाची जास्त घनफळाच्या फवारणी (नॅपसॅक) पंपाद्वारे फवारणी केल्यास फवारणीचे द्रावण पोंग्यात जाऊन नियंत्रण मिळते.

२) रासायनिक किटकनाशकांचा वापर फवारणी सायंकाळी किंवा सकाळी करावी. तसेच द्रावणाचे जाडसर तुषार पोंग्यामध्ये पडेल अशा प्रकारे फवारणी करावी म्हणजे अळ्यांचे प्रभावी नियंत्रण करता येईल.

३) चाऱ्यासाठी घेतलेल्या मका पिकावर कुठल्याही प्रकारच्या रासायनिक किटकनाशकाची फवारणी करू नये त्याऐवजी जैविक किटकनाशकाचा वापर करावा.

गोंडा ते रेशीम अवस्था (उगवणी नंतर ८ आठवडे)

या अवस्थेत रासायनिक किटकनाशकांचा वापर किफायतशीर नाही. म्हणून मोठ्या अळ्या वेचाव्या.

# साडेचार हजारांचे लाचप्रकरण; वनपाल 'एसीबी'च्या जाळ्यात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती–** वरुडजवळील शहापूरचा वनपाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकला आहे. धनंजय अरविंदराव भटकर (वय ४७, रा. एकविरा विद्युत कॉलनी, दत्त = मंदिराजवळ, अमरावती) असे या - वनपालाचे नाव आहे. साडे चार - हजारांची लाच घेताना पोलिसांनी - त्याला ताब्यात घेतले. लाचलुचपत विभागाच्या - पोलिसांनी मंगळवारी या प्रकरणात - गुन्हा दाखल केला. भटकर याने शेतातील सागवानची झाडे तोडून - विकण्यासाठी आवश्यक असलेली परवानगी देण्यासाठी



प्रति झाड दीडशे रुपये याप्रमाणे ४ हजार ९५० रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीअंती साडे ४ हजार रुपयांत हा व्यवहार पक्का झाला. ही रक्कम स्वीकारताना त्याला ताब्यात घेण्यात आले. शहापुर येथील क्षेत्र सहायक, शेकदरी सर्कल कार्यालयात तो पकडला गेला. एसीबीचे पोलिस अधीक्षक मारुती जगताप यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक चित्रा मेसरे, पोलिस कर्मचारी केतन मांजरे, शिपाई शैलेश कडू, वैभव जायले, चंद्रकांत जनबंधू यांनी ही कारवाई केली. दरम्यान हे प्रकरण वरुड पोलिसांकडे वर्ग करण्यात आले असून, पुढील तपास ते करित आहेत.




# विद्यार्थ्यांनो... परीक्षेच्या तणावातही मेंदूला फ्रेश ठेवेल 'हा' आहार!


**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या १०वी आणि १२वीच्या बोर्ड परीक्षा सुरू असून, अनेक विद्यार्थी अभ्यासाच्या तणावाखाली असतात. हा तणाव त्यांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करू शकतो. त्यामुळे परीक्षेदरम्यान योग्य आहार घेणे आणि मानसिक तयारी करणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य आहार मेंदूच्या कार्यक्षमतेला चालना देतो, लक्ष केंद्रित करण्यास मदत करतो आणि स्मरणशक्ती वाढवतो.

**विद्यार्थ्यांसाठी परीक्षेच्या काळातील योग्य आहार:** प्रथिनेयुक्त आहार प्रथिने तसेच प्रथिनेयुक्त पदार्थ मेंदू आणि मानवी शरीरासाठी अत्यंत आवश्यक असतात. आपल्याला दुध आणि दुग्धगजन्य पदार्थातून मोठ्या प्रमाणात प्रथिने मिळतात. दुधात कॅल्शियम आणि प्रथिने भरपूर प्रमाणात असतात. रोज कोमट दूध घेतल्याने मेंदू कायम सक्रिय राहतो.डाळी आणि कडधान्ये आपल्या शरीरासाठी पोषक असतात. त्यामध्ये तूरडाळ, मूगडाळ, मसूरडाळ यामध्ये फायबर आणि प्रथिने भरपूर असतात, जे पचनासाठी चांगले असतात. यासोबतच अंड्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने असतात.ते मेंदूच्या कार्यक्षमतेस चालना देतात. उकडलेले अंडे खाल्यास ऊर्जा मिळते. मांसाहारमध्ये चिकन आणि मासे प्रथिनेयुक्त असून, ओमेगा-३ फॅटी ॲसिडसुद्धा मेंदूसाठी उपयुक्त ठरतात.

**ड्रायफ्रूट्स आणि नट्स** बदाम खाल्याने स्मरणशक्ती सुधारण्यासाठी मदत होते. रोज ५-६ बदाम भिजवून खाणे हे स्मरणशक्ती वाढवण्यास लाभदायक ठरते. त्याचबरोबर अक्रोड खाल्याने ओमेगा-३ फॅटी ॲसिड भरपूर प्रमाणात मिळते हे मेंदूला उत्तम कार्यक्षमतेस मदत करते. तसेच मनुका आणि खजूर हे नैसर्गिक गोड पदार्थ असून, शरीराला त्वरित ऊर्जा देतात. चिया सीड्स आणि फ्लॅक्ससीड्स हे ब्रेन फूड मानले जातात. यामुळे एकाग्रता वाढते.

**फळे आणि भाज्या** – केळी हे ऊर्जा वाढवणारे फळ असून, झोप न लागणे किंवा थकवा जाणवत असल्यास केळी खाणे फायदेशीर आहे. याचबरोबर डॉक्टर सांगतात, -प रश्रिश र वरू ज्ञशर्शीी हिंश वेर्ल्गी ुरु ही म्हण खरी ठरते. सफरचंद मेंदूच्या कार्यक्षमतेस चालना देते. तसेच ड्रॅगन फ्रूट आणि ब्लूबेरी, स्ट्रॉबेरी आणि हे अँटीऑक्सिडंट्सने



भरलेले असतात आणि स्मरणशक्ती सुधारतात. हिरव्या भाज्या ज्यामध्ये पालक, मेथी, कोबी यासारख्या पालेभाज्यांमध्ये जीवनसत्त्वे असतात, ज्या मेंदूच्या कार्यक्षमतेस मदत करतात. परिक्षा काळामध्ये आहार घेताना गाजर आणि बीट खाल्यास ते डोळ्यांसाठी फायदेशीर आहे. यामुळे या भाज्या रक्ताभिसरण सुधारतात.परिक्षा काळामध्ये ज्वारी, बाजरी, नाचणी हे पोषणयुक्त धान्ये असून, पचनासाठी चांगले असतात. त्याच बरोबरच वारंवार झोप येत असेल तर ओट्स आणि ब्राउन राइस खाल्याने झपाट्याने ऊर्जा मिळेत अन् झोप गायब होण्यास मदत होते.

**परिक्षा काळात हे पदार्थ खाऊ नयेत.**

जंक फूड आणि तेलकट पदार्थ: हे शरीरात सुस्ती आणतात आणि पचनास त्रास देतात.

**परीक्षा तणाव दूर करण्यासाठी मानसिक तयारीचे उपाय:** योग व ध्यान: दररोज १५-२० मिनिटे ध्यान किंवा प्राणायाम केल्याने मन शांत राहते. वेळेचे नियोजन करा: अभ्यासाचे योग्य वेळापत्रक तयार करून त्यानुसार अभ्यास करा.

अभ्यासात ब्रेक घ्या: २५-३० मिनिटे सतत अभ्यास केल्यानंतर ५-१० मिनिटे ब्रेक घ्या.

शारीरिक हालचाल करा: लहान वॉक किंवा स्ट्रेचिंग केल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि एकाग्रता वाढते.

# अमरावतीत १३,६६५ शिक्षकांना ८ मार्चपर्यंत प्रशिक्षण; तज्ज्ञ शिक्षकांचे प्रशिक्षण पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती–** अमरावती जिल्ह्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी आता माध्यमिक व प्राथमिक शिक्षण स्तरावर सुरू होत आहे. डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय प्रबोधिनीत झालेल्या प्रशिक्षणात १४ तज्ज्ञ मार्गदर्शकांनी ३१४ 'की रिसोर्स टिचर्स'ना प्रशिक्षित केले आहे.राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (पुणे) आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय निवासी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यामध्ये प्राथमिक स्तरातील १४४ आणि माध्यमिक स्तरातील १७० शिक्षकांचा समावेश होता. प्रशिक्षणात एनईपी २०२०, राज्य अभ्यासक्रम आराखडा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन, क्षमता आधारित मूल्यांकन कार्यनीती आणि प्रश्न निर्मिती कौशल्ये यांसारख्या महत्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले. आता तालुका स्तरावर ८ मार्चपर्यंत प्रशिक्षण कार्यक्रम राबवला जाणार आहे. यामध्ये प्राथमिक विभागातील ५,४०४ आणि माध्यमिक विभागातील ८,२६१ असे एकूण १३,६६५ शिक्षक सहभागी होणार आहेत. प्रत्येक तालुक्यात पाच दिवसांचे प्रशिक्षण पाच टप्प्यांमध्ये पूर्ण केले जाणार आहे. या प्रशिक्षणात पहिली ते बारावी इयत्तेपर्यंत शिकवणारे सर्व शिक्षक सहभागी होणार आहेत.



# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १३ फेब्रुवारी २०२५

शहर/ग्रामिण

# जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कक्षात भीम ब्रिगेडच्या कार्यकर्त्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१३अमरावती–** दर्यापूर तालुक्यातील एका सहा वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचारानंतर उपचारासाठी दिरंगाई केल्याप्रकरणी संबंधित अधिपरिचारिकांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना अभय देण्यात आल्याचा आरोप करीत भीम ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी आज बुधवारी जिल्हा शल्य चिकित्सकांना जाब विचारला, यावेळी एका कार्यकर्त्याने कक्षातच स्वत:च्या अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पण, पोलिसांनी लगेच या कार्यकर्त्याला ताब्यात घेतल्याने अनर्थ टळला.





गेल्या १८ जानेवारी रोजी दर्यापूर तालुक्यातील सहा वर्षीय मुलीवर एका नराधमाने अत्याचार केला. पीडित मुलीला जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले. मात्र रुग्णालयातील दोन अधिपरिचारिकांनी पीडित मुलीला दीड तास थंडीत फरशीवर बसवून ठेवले, तिला बेड आणि कक्ष देखील उपलब्ध करून देण्यात आला नाही, याबद्दल विचारणा करण्यासाठी गेलेल्या भीम ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांसोबत संबंधित अधिपरिचारिकांनी अरेरावीची भाषा वापरून पीडित मुलीच्या नातेवाईकां सोबत गैरवर्तणूक केली आणि तिच्यावर उपचार केले नाहीत, असे भीम ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांचे म्हणणे होते. दरम्यान, या मुद्यावर भीम ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष राजेश वानखडे यांच्या नेतृत्वात २० जानेवारी रोजी जिल्हा शल्य चिकित्सक दिलीप सौंदळे यांच्या कक्षात ठिय्या आंदोलन करण्यात आले. त्यानंतर संबंधित अधिपरिचारिकांना निलंबित करण्यात आल्याचे पत्र कार्यालयाकडून देण्यात आल्यानंतरही एक कर्मचारी त्याच दिवशी कामावर हजर होत्या आणि दुसऱ्या कर्मचारी रुग्णालयात दाखल झाल्या होत्या. भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या हस्तक्षेपानंतर या दोन कर्मचाऱ्यांवरील कारवाई मागे घेण्यात आली, असा आरोप राजेश वानखडे यांनी केला होता.

या प्रकरणात जातीभेद करण्यात आल्याचा आरोपही भीम ब्रिगेडने केला. संघटनेतर्फे आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा देखील देण्यात आला होता. दरम्यान, राजेश वानखडे यांच्या नेतृत्वात भीम ब्रिगेडचे कार्यकर्ते जिल्हा शल्य चिकित्सकांच्या कार्यालयात पोहचले. राजेश वानखडे हे दिलीप सौंदळे यांच्यासोबत चर्चा करीत असताना अचानकपणे एका कार्यकर्त्याने स्वत:च्या अंगावर पेट्रोल ओतून घेतले. त्यानंतर लगेच इतर कार्यकर्त्यांनी आणि पोलिसांनी पकडून ठेवले. त्याला सुरक्षितपणे पोलिसांनी कक्षाच्या बाहेर नेले. या घटनाक्रमामुळे जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात काही काळ गोंधळ उडाला.

# सहा जणांचे प्रमाणपत्र बनावट, फौजदारी गुन्हा दाखल

## अंजनगावसुर्जी बनावट कागदपत्रे प्रकरण.....

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१३अंजनगाव सुर्जी –** येथील तहसील कार्यालयातून बनावट कागदपत्रांच्या आधारे बेकायदेशीरपणे जन्म प्रमाणपत्र मिळविल्याबद्दल अंजनगावसुर्जी पोलीस ठाण्यात सहा जणांविरुद्ध दोन फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. याप्रकरणाची चौकशी केल्यानंतर, अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयाने दोन जणांविरुद्ध आणि अंजनगाव सुर्जी पोलिसांनी चार जणांविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.



स्वत:च्या फायद्यासाठी जन्म प्रमाणपत्र मिळविण्याकरिता बनावट कागदपत्रे तयार केली आणि ती खरी असल्याचे दाखवून सरकारशी फसवणूक केली. याप्रकरणात ज्या सहा जणांची नावे आहेत त्यात एका महिलेचाही समावेश आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, बनावट कागदपत्रांचा वापर करून अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयातून जन्म प्रमाणपत्र मिळवल्याबद्दल अंजनगाव सुर्जी पोलिसांचे एपीआय भास्कर यांनी सय्यद करामत अली सय्यद नूर, शेख नजीर शेख रशीद आणि रशीद खान अयान खान आणि तहसील कार्यालयात अब्दुल सलीम अब्दुलसत्तार (७३, मोट मार्केट काझीपुरा) आणि किसनराव रामजी नेवाडे (शिवाजी चौक) यांच्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्याआधारे अंजनगाव सुर्जी पोलिसांनी सर्व सहा आरोपीविरुद्ध बीएनएसच्या कलम ३१८ (२), ३३६ (२), ३३६ (३), ३३७ आणि ३४० (३२) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी बांगलादेशी आणि रोहिंग्या अंजनगावसुर्जी तहसील परिसरात बेकायदेशीरपणे राहतजन्म प्रमाणपत्र मिळवित असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन केली आणि याप्रकरणाची चौकशी केल्यानंतर सहा जणांचे जन्म प्रमाणपत्र सदोष आढळून आले. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले.

### १९०० नाही, फक्त ३ जन्म प्रमाणपत्रे चुकीची

तपासादरम्यान, चुकीच्या कागदपत्रांद्वारे जन्म प्रमाणपत्र मिळविल्याची केवळ तीन प्रकरणे समोर आली आहेत. उर्वरित सर्व प्रमाणपत्रे नियमांनुसार देण्यात आली आहेत. तहसीलदार आणि उपविभागीय पोलीस अधिकारी यासंदर्भात पुढील तपास करत आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी प्रसृत केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भात समितीचे गठन केले होते.

# बालगृह, वन स्टॉपचे काम तातडीने पूर्ण करावेत- जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती,** सार्वजनिक बांधकाम विभागाने जिल्ह्यातील बालगृहाचे बांधकाम आणि वन स्टॉप सखी सेंटरच्या दुरुस्तीचे काम तातडीने पूर्ण करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिल्या. जिल्हा महिला व बाल विकासच्या विविध योजनांशी संबंधित आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, विभागीय महिला व बालविकास अधिकारी विलास मसराळे, महिला व बालविकास अधिकारी उमेश टेकाळे आदी



उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांच्या अध्यक्षतेखाली महिला व बाल विकास विभागाची त्रैमसिक आढावा बैठक घेण्यात आली. यात बालगृह बांधकाम, वन स्टॉप सेंटर, कार्यस्थळी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३, वन स्टॉप सेंटर-२, पिंक रिक्षा योजना, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, अनाथ प्रमाणपत्र, बालविवाह प्रतिबंध, ग्राम बाल संरक्षण समिती, बाल कल्याण समिती, अपराधी परिविक्षा अधिनियम, पुनर्वसन आणि सर्वसमावेशक सल्लागार समितीचा आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांनी विविध विषयांवर चर्चा करून निर्देश दिले. यामुळे जिल्ह्यातील महिला व बालकल्याण विषयक उपक्रमांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळणार आहे.

# दहावी, बारावीच्या परिक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती,**

दहावी आणि बारावीच्या परिक्षा सुरळीत पार पाडाव्यात आणि परिक्षा केंद्रावरील गैरप्रकार टाळण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम १६३ लागू करण्यात आले आहे. त्यानुसार परिक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश देण्यात आले आहे.



बारावीची परिक्षा दि. ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ आणि दहावीची परिक्षा दि. २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ दरम्यान होणार आहे. या कालावधीत जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रावर गैरप्रकार टाळण्यासाठी तसेच परीक्षा परिसरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे.

सर्व परीक्षा केंद्रावरील गैरप्रकार टाळण्यासाठी आणि परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी सदर कालावधीत जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटरच्या परिसरात व्यक्तींच्या प्रवेशावर निर्बंध घालण्यात आले आहेत. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स केंद्र, झेरॉक्स केंद्र व ध्वनीक्षेपके बंद ठेवण्यात येणार आहेत.सदर आदेश जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रास लागू करण्यात आले असून दि. १८ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजेपर्यंत लागू राहतील. यासाठी विद्यार्थ्यांसह पालक, नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी केले आहे.-

# बिल काढण्यासाठी घेतली लाच, महिला सरपंचाला अटक; गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती :-** बांधकामाचे बिल काढण्यासाठी कंत्राटदाराकडे लाचेची मागणी करणाऱ्या महिला सरपंचाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यांच्याच घरी लाच स्वीकारताना ताब्यात घेतले. या प्रकरणी खोलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोनू मुरलीधर सोळंके (३०, रा. सोनारखेडा) असे गुन्हा दाखल झालेल्या सरपंच महिलेचे नाव आहे. त्या भातकुली तालुक्यातील सोनारखेडा येथे सरपंच म्हणून कार्यरत आहेत. या प्रकरणातील तक्रारकर्ते हे कंत्राटदार आहेत. त्यांनी सोनारखेडा गावात वेगवेगळी बांधकामे केली होती. त्यांच्या बांधकामाचे बिल देखील काढण्यात आले. त्याची रक्कम देखील त्यांना प्राप्त झाली. हे काम मिळवून देण्यासाठी मदत केल्याबद्दल बक्षीस म्हणून ४१ हजार रुपयांची मागणी सोनू सोळंके यांनी कंत्राटदाराकडे केली होती. एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे कंत्राटदाराने सांगितले, त्यावर काही रक्कम कमी करता येईल, असे सरपंच महिलेचे म्हणणे होते.ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक मारूती जगताप, अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक मंगेश मोहोड याच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक संतोष तागड, योगेशकुमार दंदे, पोलीस हवालदार विनोद धुळे, पोलीस अंमलदार आशीष जांभोळे, महिला अंमलदार चित्रलेखा वानखडे, विद्या पाटील, चालक पोलीस हवालदार गोवर्धन नाईक यांनी पार पाडली.

# 'समृद्धी'चा ७६ कि.मी.चा शेवटचा टप्पा खुला होणार; मुंबई-नागपूर प्रवास अधिक जलद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३मुंबई –** समृद्धी महामार्गाचा इगतपुरी ते ठाण्यातील आमने हा शेवटचा टप्पा येत्या महिनाभरात वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे. या मार्गाची आता अंतिम टप्प्यातील कामे पूर्ण झाली आहेत.

आता समृद्धी महामार्गाचा शेवट होतो, त्या आमने येथून पुढे नाशिक मार्गावरील वडपेपर्यंतची कनेक्टरची कामे सुरू आहेत. ही कामे पूर्ण होताच हा ७६ किमी लांबीचा शेवटचा टप्पा सुरू होणार आहे. या टप्प्यात अभियांत्रिकीच्या दृष्टीने किचकट असलेल्या ठाण्यातील खर्डी येथील एका जवळपास १.५ किमी लांबीच्या पुलाचे काम बाकी होते. तसेच समृद्धी महामार्गाचा शेवट होतो त्या आमने येथून पुढे वडपे येथे जाण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या रस्त्याचे काम अपूर्ण होते. या भागात असलेल्या गोडाऊनची जागा रस्त्याच्या कामासाठी आवश्यक होती. ही जागा मिळण्यात येणाऱ्या अडचणी, तसेच सततच्या पावसामुळेही कामे लांबली होती. मात्र आता पावसाळा संपल्यानंतर एमएसआरडीसीकडून ही कामे जलदगतीने पूर्ण केली जात आहेत. महिनाभरात ही कामे पूर्ण होतील, अशी माहिती एमएसआरडीसीतील अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे मार्चच्या सुरुवातीला हा मार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाऊ शकतो. त्यानंतर मुंबईपर्यंतचा प्रवास सुकर होणार आहे.



**गेल्या वर्षी सुरू झाला होता तिसरा टप्पा** – समृद्धी महामार्गाचा नागपूर ते शिर्डी हा ५२० किमीचा पहिला टप्पा डिसेंबर २०२२ मध्ये सुरू करण्यात आला होता. तर दुसऱ्या टप्प्यात शिर्डी ते भरवीर असा जवळपास ८० कि.मी.चा मार्ग सुरू करण्यात आला होता. गेल्यावर्षी वर्षी तिसऱ्या टप्प्यात एमएसआरडीसीने भरवीर ते इगतपुरी हा आणखी २३ किमीचा मार्ग सुरू केला होता. त्यामुळे सद्यस्थितीत नागपूरवरून निघालेली वाहने थेट इगतपुरीपर्यंत विनाअडथळा पोहोचत आहेत. महिनाभरात या वाहनांना मुंबईच्या वेशीवर पोहोचणे शक्य होणार आहे.

संपूर्ण ७०१ किमी लांबीचा मार्ग वाहतूक सेवेत येणार

हा टप्पा खुला झाल्यानंतर मुंबई-नागपूर हा प्रवास अधिक जलद होईल. समृद्धी महामार्गाचा शेवटचा टप्पा वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर नागपूरहून निघालेल्या वाहनांना थेट मुंबईच्या वेशीवर पोहोचणे शक्य होणार आहे. तसेच या महामार्गाचा संपूर्ण ७०१ किमी लांबीचा मार्ग वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी हा शेवटच्या टप्प्यातील मार्ग खुला केला जाणार होता.

# वीजबिल थकले आहे का? तपासा आणि नंतरच प्रॉपर्टी खरेदी करा

## अन्यथा थकबाकी नव्या मालकाकडून वसूल होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती–** एखाद्या घराची, जागेची मालकी बदलली तरी पूर्वीच्या वीजबिलांच्या थकबाकीची वसुली करण्याचा अधिकार वीज वितरण कंपन्यांना असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. त्यामुळेच जुनी जागा, फ्लॅट, घर घेताना सावध रहा. त्याचे वीजबिल तपासा. कारण, पूर्वीच्या मालकाने थकविलेले वीजबिल नंतरच्या नवीन मालकाकडून वसूल होणार आहे.

दरम्यान, ज्या कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित (पी.डी.) ग्राहकांकडे वीजबिलाची थकबाकी आहे, त्यांना महावितरण अभय योजनेत व्याज व दंड माफ करून वीजबिल भरण्याची संधी देण्यात आली आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत सुरू असलेल्या या योजनेचा लाभ घेऊन संबंधितांनी बिले भरावी आणि पुढील कारवाई टाळावी, असे आवाहन महावितरणने केले आहे. एखाद्या जागेचे वीजबिल थकित असेल आणि जागेचा विक्री व्यवहार झाला असेल, तर नवीन मालक वीज जोडणीसाठी नव्याने अर्ज करतात. त्यामुळे त्या जागेवरील पूर्वीच्या बिलाची थकबाकी प्रलंबित राहून वीज वितरण कंपन्यांचे नुकसान होते. त्यामुळे जागेच्या वीज बिलाची थकबाकी वसूल केल्याशिवाय नवीन वीजजोडणी देण्यास नकार देण्याचे अधिकार वीजवितरण कंपन्यांना आहेत. त्याविरोधात वीजबिलाची थकबाकी असलेली जागा खरेदी केलेल्या नव्या मालकांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

महाराष्ट्रासह काही राज्यांतून अशा प्रकारची १९ प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने निकाल देताना, जागेची मालकी बदलली तरी पूर्वीच्या वीजबिलांच्या थकबाकीची वसूली करण्याचा अधिकार वीज कंपन्यांना असल्याचे स्पष्ट केले आहे.




महावितरणच्या अमरावती परिमंडलात ३१ मार्च २०२४ पर्यंत वीजबिलांच्या थकबाकीमुळे लघुदाब वर्गवारीतील घरगुती,वाणिज्यक,औद्योगिक आणि इतर वर्गवारीतील १ लाख ७६ हजार ७९८ ग्राहकांचा वीज पुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला आहे. या ग्राहकांकडे १५४ कोटी १७ लाख रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये अमरावती जिल्ह्यातील ७१ हजार १४५ ग्राहकांकडे ६६ कोटी ९२ लाख आणि व यवतमाळ जिल्ह्यातील १ लाख ५ हजार ६५३ ग्राहकांकडे ८७ कोटी २५ लाख रूपये थकीत आहे.

थकबाकी वसुलीसाठी या ग्राहकांची पडताळणी करण्याची मोहीम सुरू आहे. त्या अंतर्गत एखाद्या जागेच्या पूर्वीच्या मालकाने किंवा ताबेदाराने थकविलेल्या वीजबिलाची थकबाकी नंतरच्या नवीन मालक किंवा ताबेदाराकडून वसूल करण्याच्या सूचना कर्मचाऱ्यांना दिल्याचे महावितरणतर्फे सांगण्यात आले.

# मेळघाटातील २२ गावे अंधारात

## नवनीत राणांची मागणी काय?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती : –** मेळघाटातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील २२ गावांमध्ये अद्यापही वीज पुरवठा नसल्याने ही गावे अंधारात आहेत. त्यामुळे आदिवासी नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. वाहतुकीच्या वेळी अंधार असल्याने अपघातही होता. या गावांना वीज पुरवठा करण्यासाठी ५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी मागणी माजी खासदार नवनीत राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. विशेष म्हणजे आपण अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री असताना तत्कालीन खासदार म्हणून या प्रश्नाकडे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत लक्ष वेधले होते, याची आठवण नवनीत राणा यांनी आपल्या निवेदनात करून दिली आहे.

देवेंद्र फडणीस हे अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री असताना तत्कालीन खासदार या नात्याने नवनीत राणा यांनी जिल्हा नियोजन समितीमध्ये मेळघाट क्षेत्रातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील २२ गावांमध्ये वीज नाही. अशा गावांना वीज पुरवठा करणेसाठी ५६ कोटी रूपये मंजूर करा, अमरावती जिल्ह्यामध्ये नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी ६४ कोटी रूपये मंजूर करा, अशा महत्वाच्या मागण्या केल्या होत्या. या बैठकीचा पुन्हा संदर्भ देत नवनीत राणा यांनी मुख्यमंत्र्यांकडे निवेदन पाठवले आहे.मेळघाटातील अनेक गावे आजही विद्युत पुरवठा पोहोचला नसल्याने अंधारात चाचपडत आहेत. अनेक गावांना ये-जा करण्यासाठी रस्ता नाहीत. वीज, पाणी, आरोग्य, शिक्षण या सुविधांपासून येथील आदिवासी वंचित आहेत. या परिसरात नेमले जाणारे शासकीय कर्मचारी काळ्या पाण्याची शिक्षा म्हणून आपल्या सेवेकडे पाहतात. परिणामी त्यांच्यात सेवाभाव नसल्याने सतत मुख्यालयी बेपत्ता राहत असल्याचे वास्तव आहे. तालुका किंवा जिल्हास्तरावरूनच त्यांचे कामकाज चालते. परिणामी आदिवासींना सुविधांची माहिती होत नाही. त्यांच्यापर्यंत कुठलीही योजना पोहोचत नाही, असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.अनेक गावात चांगले रस्तेच नसल्याने दळणवळणाची साधने अत्यल्प आहेत. महामंडळाची बस आजही मेळघाटातील शंभरपेक्षा अधिक गावांत पोहोचतच नसल्याचे वास्तव आहे. परिणाम शाळेतील शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत. त्यांना मुख्यालयी राहण्याची सक्ती करण्यात यावी, आश्रमशाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आदिवासी मुलांना खेळण्या साठी साहित्य पुरविण्यात यावे, अशी मागणी आहे. मेळघाटा तील आदिवासी पाड्यांपर्यंत विकासकामे पोहोचल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात एसटी बस, रस्ता, वीज, आरोग्य, शिक्षण या अत्यावश्यक असलेल्या सुविधा पोहोचल्या नाहीत. २२ गावांमध्ये विद्युत पुरवठा देखील पोहोचला नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

# मालकी, हक्क, देखभाल,दुरुस्ती साबांविची, स्वच्छतेची जबाबदारी मात्र, मनपाची....

## बि अँड सीने बांधलेल्या रस्ते नाल्यांची स्वच्छता बि अँड सिनेच करावी...



विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१३अमरावती–** अमरावती महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभाग अमरावतीकरांच्याच प्रशासकीय सेवेकरीता असलेत तरी, अमरावती शहरातील मुख्य वर्दळ,वाहतूक, रहिवासी आणि व्यापारी मार्केट परिसर असलेल्या तेराचे तेराही (१३) रस्त्यांची देखभाल, दुरुस्ती आणि,हक्क, मालकी, हि केवळ सार्वजनिक बांधकाम विभागाचीच असून, स्वच्छतेची जबाबदारी मात्र, अमनपाची असल्यामुळे स्थानिक नागरिक आणि मनपा प्रशासन यांना वर्षानुवर्षा पासून साबांवीच्या तांत्रिकदृष्ट्या चुकीच्या बांधकामामुळे सर्वांगीण स्तरावर सर्वदूर होणारा असह्य त्रास यापुढे बंद करावा, अन्यथा,जो त्रास आज नागरिक आणि,मनपाला भोगावा लागत आहे. त्यापेक्षाही, कायदेशीर कारवाईचा बडगा जनआरोग्य आणि प्रशासनहितार्थ सा.बां.विभागावर उगारण्यात येणार आहे. मुळात आजच्याही काळात ९९ टक्के अमरावतीकरांना हेच माहिती नाही की, शहरातील अकोला, यवतमाळ अमनपा हद्द प्रारंभ ते नागपूर रोड अमनपा हद्द समाप्ती, भातकुली, वलगाव अमनपा हद्द प्रारंभ ते चांदुर रेल्वे, कोंडेश्वर, भानखेडा हद्दसमाप्ती पर्यंतचे रस्ते, जुना बायपास क्र.६, आणि, रिंगरोडचे दुतर्फा असलेली रहिवासी घरे, व्यापारी, मार्केट परिसरातिल रस्ते आणि नाल्यांचे साबांवीने केलेले बांधकाम मनपाकरिता अडचणीचे तर, नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. या स्वरूपाच्या नाल्या व रस्ते मनपा अंतर्गत असलेल्या भौगोलीक रचनेचा त्रास मुख्य वर्दळ, वाहतूक रहिवासी,व्यापारी, मार्केट परिसर असलेल्या या तेराही रस्ते आणि, रस्त्याचे दुतर्फा असलेल्या रहिवाश्यांना होतो आहे. साबांविने बांधलेल्या नाल्यांचा उतार, सांडपाण्याची अंतिम निकासी, विहित ठिकाणी जोडणी, हि प्रत्यक्षात तांत्रिकदृष्ट्या अयोग्य असल्यामुळे स्वच्छता आणि, आरोग्याचे दृष्टीने प्रचंड घातक व त्रासदायक ठरत आहे. यांसह ईतर,अन्य विकासात्मक कामांचे पुरतेच बारा वाजलेले आहे. माजी उप महापौर प्रमोद पांडे यांनी या संदर्भातील, प्रत्यक्ष पुरावे मनपाकडे व्हिडिओसह सादर केले असून, मनपा एन.ओ.सी.ची आवश्यकता नसलेल्या आणि, मालकी, हक्क, देखभाल व दुरुस्ती याची अधिकृत जबाबदारी असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाला एकतर स्वच्छतेचीही जबाबदारी देण्यात यावी, किंवा साबांविला लागणाऱ्या एन. ओ. सी. मध्ये यापुढे स्वच्छता राखल्या जाईल अशा स्वरूपाच्या अटी शर्ती बंधनकारक करण्यात याव्यात, अशी मागणी वजा विनंती प्रमोद पांडे यांनी केली आहे. मनपा आणि स्वच्छता हा संपूनही न संपणारा विषय असून, स्वच्छते करिता, मनपातआधीच, अस्वच्छता निर्माण झालेली आहे.त्यातच, बि अँड सीचे रस्ते,नाल्या बांधकामामुळे अधिकच अडचणी निर्माण झालेल्या आहेत. अखेर, आज स्थानिक, जुना बायपास क्र.६ येथील यशोदा नगर ते दस्तुर नगर ते गोंडबाबा मंदिर ते मनोर मांगल्य ते सामरा नगर रस्त्याच्या दुतर्फा केलेल्या नालीच्या आणि,बाबा हरदासराम सोसायटी येथील रस्ता बांधकामामुळे होणारा अस्वच्छतेचा सर्वांगीण त्रास,दूर व्हावा याकरिता, प्रमोद पांडे यांनी उभे राहून आमरण उपोषणाचा मार्ग नाईलाजास्तव स्विकारल्या नंतर, झालेल्या चर्चेअंती ठरल्याप्रमाणे आज दि.१२ फेब्रुवारी,२०२५ रोजी मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांना स्वच्छतेची नेमकी अडचण काय आणि, जबाबदार कोण हे प्रत्यक्ष दाखविण्यात आले. विकासात्मक कामे पूर्ण करणे आणि,फरशी स्टॉप येथील भुयारी गटार योजना जोडणी यासंदर्भात, झालेल्या चर्चेप्रमाणे, मनपाने तात्काळ कारवाई करावी, असे प्रमोद पांडे यांनी स्मरण करून दिले आहे.

# कुंभमेळ्यात कोट्यवधी लोक स्नान करूनही गंगा नदी करते स्वतःला शुद्ध



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३प्रयागराज–** कुंभमेळ्या दरम्यान शाही स्नानादरम्यान सरकार अनेक व्यवस्था करते. कोट्यावधी लोक गंगेत स्नान करतात. कोट्यवधी लोक स्नान केल्यानंतरही, काही काळानंतर गंगा स्वतःला मूळ स्थितीत आणते. गंगेत घाण साफ करण्याची शक्ती आहे. कोट्यवधी लोक एकत्र स्नान करतात. तरीही, स्नानाच्या ठिकाणापासून पाच किलोमीटर अंतरावर गंगेचे पाणी पूर्णपणे शुद्ध आणि स्वच्छ दिसते आणि जिथे लोक स्नान करतात तिथे गंगा तीन ते चार दिवसांत अशा प्रकारे शुद्ध होते. गंगा नदीचे पाणी अनेक वर्षे साठवून ठेवले तर ते खराब होत नाही. धार्मिक प्रसंगात लाखो लोक गंगा नदीत स्नान करतात, पण साथीचा आजार पसरत नाही. दरम्यान, नागपूर येथील देशातील सर्वात मोठी संस्था असलेल्या 'नीरी'च्या (राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संस्था) शास्त्रज्ञांनी यावर केलेल्या अभ्यासातून गंगेच्या पाण्यातील तीन घटक या नदीला शुद्ध ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.'नॅशनल मिशन फॉर क्लिन गंगा' अंतर्गत गंगेच्या पाण्यावरील संशोधनाचे काम 'नीरी' या संस्थेकडे सोपवण्यात आले होते. सुमारे दोन वर्षे नीरीने २४०० किलोमीटर वाहणाऱ्या गंगेचे तीन टप्प्यात संशोधन केले. गंगेचे उगमस्थान असलेले गोमुख ते हरिद्वार, हरिद्वार ते पाटणा आणि बंगालमधील नादिया जिल्ह्यातील पाटणा ते जाफर नगर असे तीन टप्पे होते. यापैकी गोमुख ते हरिद्वार या पहिल्या भागात गंगा नदीत तीन प्रमुख घटक आढळले. त्यामुळे गंगेचे वाहते पाणी केवळ शुद्धच राहत नाही. तर घरात आणलेले आणि ठेवलेले पाणी वर्षानुवर्षे खराब होत नाही. संशोधनादरम्यान गंगा नदीच्या ५० हून अधिक ठिकाणांची चाचणी घेण्यात आली. शास्त्रज्ञांच्या पथकाला गंगेच्या पाण्यात जंतूनाशक 'बॅक्टेरियोफेज' आढळले आहेत, जे एक प्रकारचे विषाणू आहे. त्यात या रोगजनक जीवाणूंमुळे होणाऱ्या आजारांशी लढण्याचे गुणधर्म आहेत.

'नीरी'च्या शास्त्रज्ञांना गंगेच्या पाण्यात विरघळलेला ऑक्सिजन देखील आढळला. हे जवळजवळ शुद्धीकरणाच्या पातळीपर्यंत टिकते. याशिवाय गंगेच्या पाण्यात २० मिलीलीटरपर्यंत ऑक्सिजन आढळून आला आहे. शास्त्रज्ञांनी 'टर्पीन' मीठाचे 'फायटोकेमिकल' देखील शोधले आहे. गंगा शुद्धीकरणात हे तीन घटक प्रभावी ठरतात. नीरीच्या शास्त्रज्ञांनी गौमुख ते टिहरी धरणादरम्यान पहिल्या फेरीचे संशोधन केले. या दुरुस्तीनंतर, गंगा इतकी पवित्र का आहे हे तथ्य उघड झाले.

# 'लाडकी बहीण'सारख्या योजनांवर सर्वोच्च न्यायालयाची नाराजी.....




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई –** गेल्या काही वर्षांमध्ये राजकीय पक्ष निवडणुकांच्या तोंडावर नागरिकांसाठी विविध योजना जाहीर करत आहेत. ज्यामुळे मोफत लाभांच्या योजनांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. अशात बुधवारी या पद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि म्हटले की, अशा योजनांमुळे लोक काम करण्यापासून आणि देशाच्या विकासात सहभागी होण्यापासून परावृत्त होत आहेत. न्यायमूर्ती बीआर गवई म्हणाले, दुर्दैवाने, या मोफत योजनांमुळे लोक काम करण्यास तयार नाहीत. त्यांना मोफत रेशन मिळत आहे. त्यांना कोणतेही काम न करता पैसे मिळत आहेत. मध्य प्रदेश, हरियाणा आणि महाराष्ट्र यासारख्या राज्यांमध्येही मासिक आर्थिक मदतीची अशीच आश्वासने देण्यात आली होती, ज्यामुळे त्या-त्या राज्यांच्या निवडणुकीत भाजपा च्या विजयात या योजनांनी मोठा वाटा उचलला होता.दरम्यान न्यायमूर्ती बीआर गवई आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर एका याचिकेवर सुनावणी सुरू होती. त्यावेळी न्यायमूर्ती बीआर गवई यांनी ही टिप्पणी केली. या याचिकेत शहरी भागातील बेघर लोकांना आश्रय देण्याची मागणी करण्यात आली होती.यावेळी सर्वोच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, मोफत रेशनमुळे, निवडणुका जाहीर झाल्यावर लोक काम करण्यास तयार नसतात. त्यांना कोणतेही काम न करता मोफत रेशन मिळत आहे. माफ करा, पण या लोकांना मुख्य प्रवाहातील समाजाचा भाग न बनवून आपण परजीवींचा एक वर्ग निर्माण करत आहोत असे वाटत नाही का?

# जिल्ह्यातील लघुसिंचन योजना व जलसाठ्यांची गणना करणार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अकोला–** जिल्ह्यातील जलसाठे व लघु सिंचन योजनांची गणना करण्यासाठी जलसंधारण कार्यालयाकडून कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, तालुकास्तरीय बैठका घेण्यात येत आहेत.मृद व जलसंधारण विभागामार्फत लघु सिंचन योजनांची सातवी व जलसाठ्यांची दुसरी प्रगणना सुरू होत आहे. त्या अनुषंगाने अकोला तालुकास्तरीय बैठक तहसीलदार सुरेश कव्हळे यांच्या अध्यक्षतेत आज झाली. उपविभागीय जलसंधारण अधिकारी सचिनकुमार वानरे, श्रीमती आर. व्ही. गिरीपुंजे, श्रीमती पी. एस. पंडे, सहायक महसूल अधिकारी श्रीमती पी. एस. पंडे आदी उपस्थित होते.

लघुसिंचन प्रकल्प व जलसाठ्यांच्या प्रगणनेसाठी जलसंपदा, मृद व जलसंधारण, कृषी, जि. प. लघुसिंचन, तसेच ग्रामस्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य मिळवून कामाला वेग देण्याचे निर्देश श्री. कव्हळे यांनी दिले.प्रगणनेत दोन हजार हेक्टरपर्यंत क्षेत्र क्षमता असलेल्या लघुसिंचन योजना, छोटी धरणे, भूपृष्ठाखालील जलसाठ्याच्या वापरासाठीच्या योजना साध्या विहीरी, कूपनलिका, कालवे, बंधारे, विमोचक, बंद नलिका वितरण प्रणाली, उपसा सिंचन आदी सर्व बाबींचा समावेश आहे, अशी माहिती श्री. वानरे यांनी दिली.–

# संजय राऊत दलाल अन् शकुनी आहे; पवारांवरील टीकेनंतर संजय शिरसाटांचे टीकास्त्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई–** ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी शरद पवारांनी एकनाथ शिंदेंचा सत्कार केल्याच्या मुद्द्यावरून पवारांवर टीका केली आहे. त्यानंतर आता शिंदेंची शिवसेना देखील आक्रमक झाली आहे. त्यात आता शिवसेना नेते आणि मंत्री संजय शिरसाट यांनी संजय राऊतांवर टीकास्त्र सोडले आहे.

एका वृत्त वाहिनीशी बोलताना शिरसाट म्हणाले की, संजय राऊत हे ज्या पद्धतीने टीका करतात. ते पाहता संजय राऊत यांचे तोंड उद्धव ठाकरेंनी बंद करायला हवं. दुसरीकडे शरद पवार देखील आमचे विरोधक आहेत. आम्ही देखील त्यांच्यावर टीका करतो. मात्र आम्ही या स्तरावर कधीही टीका करत नाही.

शरद पवारांवर राऊतांनी त्यांनी जी टीका केली आहे.

त्याचा अर्थ त्यांनी त्यांना अप्रत्यक्षरीत्या गद्दार म्हटलं आहे. तसेच याचा दुसरा अर्थ राऊतांना महाविकास आघाडीत राहायचं दिसत नाही. त्यामुळे पवारांनी ज्या राऊतांना हात धरून पुढे आणले आहे. त्यांनीच त्यांच्यावर चिखलफेक केली आहे.

तसेच संजय राऊत एक दलाल आहे. महाभारतातील शकुनी आहे. त्यांनी प्रत्येकाची घरं फोडली आहे. उद्धव ठाकरे शरद पवार यांचीही घरं फोडली आहे. त्यामुळे आता त्यांची देखील वेळ आली आहे. त्यांच्या पापाच्या गडा भरला आहे. त्याचबरोबर दिल्लीतील साहित्य संमेलन आणि महदजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्यामध्ये गेलेल्या शरद पवारांवर टीका करणाऱ्या राऊतांनी सर्वांनाच दलाल म्हटले.

त्यांनी साहित्यिकांचाही अपमान केला. असं म्हणत शिरसाटांनी त्यांना चांगलेच सुनावले आहे.

# परीक्षेत कॉपीसाठी मदत करणाऱ्या शिक्षक, कर्मचाऱ्यांनो खबरदार, मुख्यमंत्री फडणवीसांनी दिला हा इशारा

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१३नागपूर:** दहावी व बारावीच्या परीक्षेत सामूहिक कॉपी करण्याचे प्रकार ज्या केंद्रावर उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता कायमस्वरूपी रद्द केली जावी. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपी करण्यासाठी मदत करतील त्यांना बडतर्फ करा, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी यांच्याशी परीक्षेच्या तयारीबाबत आणि कार्यवाही करण्याबाबत संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे आदेश दिले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि मंत्री उपस्थित होते. इयत्ता बारावीची परीक्षा १८ मार्चपर्यंत ३,३७३ परीक्षा केंद्रावर होणार आहे. दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च कालावधीत ५,१३० परीक्षा केंद्रावर होणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण केली असल्याचे माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर व १०० मीटर परिसरात अनाधिकृत व्यक्तींना पूर्णतः प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देतांना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगणार नाहीत याची खबरदारी घ्यावी, भरारी पथकाव्दारे कॉपी मुक्त परीक्षेची प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित आहे, अशा सूचना दिल्या.सर्व परीक्षा केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यां मार्फत विशेष बैठ्या पथकाची नियुक्ती करण्यात यावी, बैठया पथकाने परिक्षा सुरु होण्यापूर्वी एक तास परिक्षा केंद्रावर पोहोचावे व परिक्षा संपल्यानंतर उत्तरपत्रिका कस्टोडियनकडे जमा करेपर्यंत नियंत्रण ठेवावे,संवेदनशील केद्रांवर कार्यक्षम व वरिष्ठ अधिका-यांची बैठया पथकात नेमणूक करावी. असेही त्यांनी सांगितले. संवेदनशील परिक्षा केद्रांवर ड्रोन कॅमेराव्दारे आणि व्हिडीओ कॅमेराव्दारे पूर्णवेळ निगराणी करावी, सर्व तालुक्याती ल परिक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन व व्हिडीओ कॅमेरे कार्यरत असावेत यावर निगराणी ठेवण्याकरिता जिल्हाधिका-यांनी प्रत्येक तालुक्याकरिता एक विभाग-प्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी, अशा सूचना दिल्या.



# चंद्रपूर जिल्हा बँकेवर सायबर हल्ला, ३३ खात्यांतून ३ कोटी ७० लाख लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३चंद्रपूर–** गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने चर्चेत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मुख्य कार्यालयावर 'सायबर' हल्ला झाला. 'आरटीजीएस' व 'एनईएफटी' प्रणालीद्वारे खातेदारांच्या खात्यात रक्कम वळती केली जात असताना सायबर हल्लेखोरांनी संपूर्ण यंत्रणा हॅक करून ३३ ग्राहकांच्या खात्यांतील ३ कोटी ७० लाख ६४ हजार ७४२ रुपये हरियाणा येथील अज्ञात व्यक्तीच्या खात्यात वळते केले. जिल्हा बँकेच्या मुख्य शाखेचे प्रभारी व्यवस्थापक राजू पांडूरंग दर्वे यांनी रामनगर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, बँकेमार्फत 'आरटीजीएस' व 'एनईएफटी' प्रणालीसाठी नागपुरातील ट्रस्ट फिनटेक लि. या कंपनीसोबत 'कोर बँकिंग सिस्टिम'करिता करार केला आहे. यासाठी येस बँकची यंत्रणा वापरण्याकरिता येस बँक व ट्रस्ट फिनटेक यांच्यात करार आहे. याच माध्यमातून चंद्रपूर जिल्हा बँकेचे सर्व 'आरटीजीएस' व 'एनईएफटी' व्यवहार होत असतात. धनादेवी मजूर सहकारी पतसंस्थेचे ग्राहक इम्रान पठाण यांनी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गौतमी एन्टरप्रायझेस यांच्या खात्यात १३ लाख २६ हजार ६८० रुपयांचा 'आरटीजीएस' करण्यासाठी ७ फेब्रुवारीला अर्ज केला होता. मात्र 'आरटीजीएस' केलेली रक्कम संबंधित खातेदाराच्या खात्यात जमाच झाली नाही. १० फेब्रुवारीला पठाण यांनी बँकेच्या मुख्य कार्यालयात तक्रार दिली. तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली.

# जागेच्या जुन्या वादावरून महिलेची कुऱ्हाडीने हत्या

## ७८ वर्षीय आरोपीला पोलिसांनी केली अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

जागेच्या जुन्या वादातून एका महिलेची कुऱ्हाडीने हत्या केल्याची घटना शहरातील महादेव घाट परिसरात बुधवारी सकाळी १०.३० ते ११.३० वाजताच्या दरम्यान घडली. शिला ज्ञानेश्वर ढंभे (वय ५०, रा. भगवान चौक) असे मृत महिलेचे नाव आहे. याप्रकरणी श्रावण अभिमान खडगे (वय ७८, रा. भगवान चौक) याला अटक करण्यात आलेली आहे.

पोलीस सुत्रानुसार, शिला देंभे व श्रावण खडगे यांच्यात जागेच्या कारणावरून जुना वाद होता. शिला देंभे या बुधवारी सकाळी मंदिरात जात असताना श्रावण खडगे याने अचानक डोक्यावर, गालावर व हातावर कुऱ्हाडीने मारून गंभीर जखमी केले. यानंतर शिला देंभे यांना स्थानिक ग्रामीण रुग्णालयात व तेथून अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे त्यांना मृत घोषित करण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. एसडीपीओ अनिल पवार, ठाणेदार अजय आकरे, पीएसआय नंदलाल लिंगोट, पीएसआय विना पंडे, प्रशांत ढोके, रवि भुताडे यांनी घटनास्थळी भेट दिली. वैशाली प्रदीप टेंभे यांच्या तक्रारीवरून श्रावण अभिमान खडगे यांच्याविरूध्द बीएनएस कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल केला. पुढील तपास चांदूरेल्वे पोलीस करीत आहे. श्रावण खडगे हा हत्या करून पसार झाला होता. स्थानिक पोलिसांनी वेगाने तपास चक्रे फिरवित त्याला तत्काळ ताब्यात घेऊन अटक केली.

# कौंडण्यपूर येथे आजपासून श्री विजय ग्रंथाचे पारायण

## संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त महोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

श्री संत नामदेव महाराज (वारकरी पंथ) विचार प्रसारक मंडळाद्वारे कौंडण्यपूर येथील श्री गजानन महाराज मंदिरात श्री संत गजानन महाराज प्रगट दिवस उत्सव व महाप्रसादाचे आयोजन केले आहे. - त्यानिमित्त गुरूवार १३ पासून सकाळी - नऊ वाजता श्री विजय ग्रंथाचे - पारायण करण्यात येणार आहे. त्याची - सांगता बुधवारी १९ फेब्रुवारीला होईल.

महोत्सवादरम्यान बुधवारी १९ फेब्रुवारीला रात्री आठ वाजता भजनी मंडळांचे भजन, गुरूवारी सकाळी साडे नऊ वाजेपासून अभिषेक व होम हवन व पुजेला प्रारंभ होईल. त्यानंतर साडे अकरा वाजता काल्याचे कीर्तन होईल. दुपारी बारा वाजता महा आरतीनंतर महाप्रसादाच्या वितरणाला सुरूवात होईल.मोठ्या संख्येने भाविकांनी श्रींच्या प्रकट दिवस महोत्सवाचा लाभघेण्याचे आवाहन आयोजन समितीद्वारे सुधाकर होले, ज्ञानेश्वर टाकरेखेडे, गणेश बांबल, प्रभुदयाल जयस्वाल, अतुल ठाकरे, विवेक कोळहे, अजय गेडाम, प्रदीप रामेकर, राजुभाऊ इवनाते, दुर्गा भजन मंडळीसह कौंडण्यपूरवासीयांकडू न केले आहे.

# फायर सेफ्टी ऑडिट; शहरातील ८९ हॉस्पिटलची तपासणी अपूर्ण

## १५२ हॉस्पिटलची तपासणी, आस्थापना, हॉटेल्स, कार्यालयांची तपासणी केव्हा?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

वल्लभ भुवन या फरसाण विक्री करणाऱ्या आस्थापनेला लागलेल्या भीषण आगीनंतर महापालिकेचा अग्नीशमन विभाग जागा झाला. त्यांनी शहरातील हॉस्पिटल्स, हॉटेल्स, रेस्टॉरंट, मॉल, आस्थापना आणि कार्यालयांची तपासणी करण्यासाठी तीन पथकं गठित केली.

त्यांनी मागील १५ दिवसांपासून शहरातील १५२ हॉस्पीटल्सची तपासणी केली असून, अजुनही ८९ हॉस्पीटल्सची तपासणी व्हायची आहे. दरम्यान उन्हाळा तोंडावर आला असून, या कालावधीत शॉर्ट सर्किटसह इतरही कारणांनी आग लागण्याच्या घटना घडतात.अद्याप शहरातील अनेक मोठ्या आस्थापना फायर सेफ्टी ऑडिट करून घेण्याबाबत उदासीन दिसून येत आहेत. आगीपासून सुरक्षित राहणे हे प्रत्येकाचेच कर्तव्य आहे.आज करू, उद्या करू असे म्हणत या महत्त्वाच्या बाबीकडे दुर्लक्ष केले जाते. अग्नीशमन यंत्रणनाही कालबाह्य झालेली असते. शहरात अनेक अशा आस्थापना आहेत, ज्यांना आग लागली त्यांनी फायर सेफ्टीऑडिटच करून घेतले




नव्हते. ते बघता मनपाने सर्व मोठया आस्थापनांना फायर सेफ्टी ऑडिट करून घेण्याचे आवाहन केले. परंतु, त्याला फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने मनपानेच आता तीन तपासणी पथकं स्थापन करून तपासणी सुरू केली आहे.मनुष्यबळाच्या अभावाने केवळ तीनच पथकं किती आस्थापनांची तपासणी करणार हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. उर्वरित आस्थापनांची तपासणी उन्हाळ्याआधी होणार की, नाही याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# 'सालबर्डी, कोंडेश्वर' साठी विशेष बस

## शिवभक्तांसाठी लालपरी सज्ज, २३ फेब्रुवारी ते २ मार्चपर्यंत विशेष फेऱ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



महाशिवरात्रीच्या पर्वावर आयोजित श्री शंभू महादेव यात्रा सालबर्डी व कोंडेश्वर शिवालयात दर्शनासाठी होणारी शिवभक्तांची गर्दी बघता एसटी महामंडळाच्या अमरावती विभागाची लाल परीही सज्ज आहे.२३ फेब्रुवारी ते २ मार्चपर्यंत सुरू राहणाऱ्या यात्रेसाठी अमरावती, धामणगाव, परतवाड़ा, चांदूर बाजार, दर्यापूर, वरुड, मोर्शी, तिवसा येथून विशेष यात्रा बसेसचे नियोजन केले आहे. त्यामुळे भाविकांनी खासगी बसेस किंवा इतर वाहनांद्वारे प्रवास करू नये असे आवाहन एसटीद्वारे केले आहे.

### असे राहणार भाडे व मार्ग

अमरावती-सालबर्डी मार्गे लेहगाव ₹१२२
मोर्शी-सालबर्डी मार्गे दापोरी ₹२६
मोर्शी-सालबर्डी मार्गे पाला ₹ १२१
चांदुर बाजार-सालबर्डी मार्गे दापोरी ₹८१
परतवाड़ा-सालबर्डी मार्गे मोर्शी ₹१३२
वरुड-सालबर्डी मार्गे हिवरखेड ₹ १५१

# अमरावती महानगरपालिकेच्या वतीने १०० दिवस क्षयरोग शोध मोहीम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**

राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत अमरावती महानगरपालिके अंतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मोहीम राबविण्यात येत आहे. भारत २०२५ मध्ये क्षयरोग मुक्त करण्याचे उद्दिष्ट ठेवून क्षयरोग जनजागृतीबाबत वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येत आहे. ही मोहीम ७ डिसेंबर २०२४ ला सुरू करण्यात आली असून ती २४ मार्चपर्यंत चालणार आहे.मोहिमेअंतर्गत क्षयरुग्णांना शोधून त्यांना उपचाराकरिता आणणे, क्षयरुग्णांचा मृत्यूदर कमी करणे, नवीन क्षयरुग्णांचे प्रमाण कमी करणे, वंचित व अति जोखमीच्या घटकापर्यंत पोहोचून आरोग्य सेवा पुरविणे, तळागाळातील जनतेला क्षयरोगविषयक सेवा पुरविणे, क्षयरोगाविषयी जनजागृती करणे, समाजातील क्षयरोगाविषयी असलेले गैरसमज दूर करणे आंदी मुद्द्यावर मोहिमेमध्ये काम केले जात आहे. अशातच गरजू क्षयरुग्णांना सकस आहार मिळण्याच्या उद्देशाने पोषण आहार किटचे वाटपदेखील केले जात आहे. शहरातील सर्व १३ ही शहरी आरोग्य केंद्रे अशा रुग्णांची तपासणी व मोफत क्ष-किरण तपासणी करण्यात येत आहे.

# निराधार योजनेतील २२ हजार ९८९ लाभार्थ्यांचे डीबीटी पेमेंट फेल

## ८८ हजार ८८७ लाभार्थ्यांची अद्यापही थेट अनुदानाकरिता नोंदणी नाही : १ लाख ६ हजार ७७३ लाभार्थ्यवि अनुदान थांबले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

जिल्ह्यात संजय गांधी, श्रावणबाळ यानिराधार योजनेतील २२ हजार लाभार्थ्यांचे थेट अनुदान फेल झाले आहे. तर ८८ हजार ८८७लाभार्थ्यांनी थेट अनुदानाकरिता कोणतीच प्रक्रिया अद्याप केली नाही, त्यामुळे जिल्ह्यात सुमारे १ लाख ११ हजार८७६ लाभार्थ्यांचे अनुदान थांबले आहे. यामधून संजय गांधींचे ५९ हजार ५१७ तर श्रावणबाळचे १ लाख ६ हजार ७७३ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट अनुदान जमा झाले आहे.जिल्ह्यात संजय गांधी, श्रावणबाळ या निराधार योजनेसह केंद्र शासनपुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजना, राष्ट्रीय विधवा, अपंग व कुटुंब लाभाच्या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना प्रत्येकी १५०० रुपयांचे अनुदान दिल्या जाते. नोव्हेंबर २०२४ पर्यंत सदरचे अनुदान तहसीलस्तरावरून लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केले जात होते. परंतु, शासनाकडून आता प्रत्येक योजनांचे डीबीटी म्हणजेच थेट खात्यात अनुदान योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान दिले जात आहे. परंतु, याकरिता आधार लिंक करणे गरजेचे आहे. याकरिता मागील तीन ते चार महिन्यांपासून लाभार्थ्यांना तशा सूचनादेखील दिल्या जात आहे. त्यामुळे आतापर्यंत संजय गांधी योजनेमध्ये असलेल्या ९५ हजार २१७ लाभार्थ्यांपैकी ५९ हजार ५१७ लाभार्थ्यांना खात्यात डीबीटीद्वारे अनुदान जमा करण्यात आले आहे. तर ९ हजार २६० लाभार्थ्यांचेअनुदान काही त्रुटींमुळे फेल झाले. तसेच श्रावणबाळमध्ये १ लाख ८२ हजार ९४९ लाभार्थी असताना यामधून १ लाख ६ हजार ७७३ लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा झाले असून या योजनेतील १३ हजार ७२९ लाभार्थ्यांचे अनुदान फेल झाले आहे. अशा दोन्ही योजनेतील २२ हजार ९८९ लाभार्थ्यांचे अनुदान फेल झाले तर ८८ हजार ८८७ लाभार्थ्यांनी मात्र डीबीटीची प्रक्रियाच पूर्ण केली नाही. त्यामुळे अशा १० लाख ११ हजार ८७९ लाभार्थ्यांचे अनुदान जिल्ह्यात थांबले आहेत.

संजय गांधी निराधार अनुदान योजना

# ग्रामीणच्या पोलिस निरीक्षकाची ५.३४ लाखाने फसवणूक

## मुलीला हैद्राबादच्या मेडीकल कॉलेजमध्ये अॅडमीशनचे आमिष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**




ऑनलाईन ठगबाजांनी अमरावती ग्रामीण पोलिस दलात कार्यरत असलेल्या पोलिस निरिक्षकाला त्याच्या मुलीला नीट कोचिंगसह एमबीबीएसला मॅनेजमेन्ट कोट्यातून अॅडमशीन मिळूवन देण्याचे आमिष देऊन चक्क ५ लाख ३४ हजार रूपयांनी फसवणू केली आहे. याबाबत फ्रेजरपुरा पोलिसांनी मुंबईतील तीन ठगबाजांविरोधात गुन्हे दाखल केले आहे.

दिपक खांडु कडव, गणेश नारायण, ओम मुनी गिरी गणुसाई, सर्व रा. रामनगर सोसायटीनंबर ५, एक्ससर रोड, डोंगरी, गोविंदनगर, बोरीवली वेस्ट, मुंबई अशी गुन्हे दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. तर फसवणूक झालेल्या तक्रारकर्त्या पोलिस निरिक्षकांचे नाव संतोष शामसिंग डाबेराव (५०) असे आहे. माहितीनुसार, पीआय संतोष डाबेराव हेअमरावती ग्रामीण पोलिस दलात कार्यरत असून सध्या त्यांची पोस्टींग एसपी ऑफीसमधील नियंत्रण कक्षात आहे. संतोष डाबेराव हे ऑक्सीजन पार्क समोरील पोलिस आशियाना वसाहतीमध्ये पत्नी व १८ वर्षीय मुलीसोबत राहतात. संतोष डाबेराव यांची मुलगी १२ वीची परिक्षा उर्तीण झाली असूनती सध्या नीटच्या परिक्षेची तयारी करित आहे. मुलीने ऑनलाईन स्टटीजव कोचिंग सेंटर सर्च करतांना वडील संतोष यांचा मोबाइल क्रमांक मेन्शन केला आहे. त्यानुसार ८ ऑक्टोंबर २०२४ रोजी संतोष डाबेराव यांच्या मोबाइलवर आधी ९९८९१५२६४३ या क्रमांकाहून समवेदना सव्व्हसेसच्या नावाने फोन आला. समोरच्या व्यक्तीने संतोष यांनायांना दिपक खांडु कडव असा परिचय देऊन मुलीला नीटचे कोचिंग देऊन हैद्राबाद येथील एलटीएमटी मेडीकल कॉलेजमध्ये मॅनेजमेन्ट - कोट्यातून अॅडमीशन देण्याचे आमिष दिले. संतोष डाबेराव यांनी स्वतः पोलिस निरिक्षक असल्याचा परिचय देत दिपक कडव कडूवची फोनवर नीट कोचिंग व एमबीबीएसच्या अॅडमशीनाबाबत चौकशी केली. संतोष डाबेराव हे मुलीच्या अॅडमशीनसाठी थोडेफार इच्छुक दिसल्याने त्यानंतर त्यांच्या मोबाइलवर ९०००११४६५१, ९९६३६०७०२४, ९९०८१२६६०० या क्रमांकावरून सतत फोन आले. संतोष डाबेराव मुलीच्या अॅडमीशनसाठी तयार झाल्याने आरोपींनी त्यांना दरवर्षी २४ लाख रूपये खर्च येईल असे सांगितले आणि तीन महिन्यात प्रोसेसींग व रजिस्ट्रेशनच्या नावाने त्यांच्याकडून ऑनलाईनने ५ लाख ३४ हजार रूपये उकळले आणि तेवढ्याच रक्मेचा डीडी घेऊन हैद्राबादला येण्याचे सांगितले. परंतु, अचानक चारही क्रमांक नॉटरिचेबलझाल्याने आपली फसवणूक झाल्याचे कळताच पीआय संतोष डाबेराव यांनी याबाबत फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी वरील नमूद आरोपींविरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# मोर्शीचे तहसीलदार राहुल पाटील निलंबित

## निवडणूक, नैसर्गिक आपत्ती, गौणखनिज उत्खनन वाहतूक कामात दिरंगाई केल्याचा ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मोर्शी**

मोर्शीचे तहसीलदार राहुल पाटील यांना निलंबित करण्याबाबतचे आदेश मंगळवारी महसूल विभागाकडून प्राप्त झाले. त्यांनी कर्तव्यावर असताना निवडणूक विषयक कामकाज, नैसर्गिक आपत्ती, गौणखनिज उत्खनन-वाहतूक व शासनाच्या प्राधान्य क्रमातील विषयात अक्षम्य दिरंगाई केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आलेला आहे.



तहसीलदार राहुल पाटील हे कार्यालयीन शिस्त पाळत नसल्याचे तसेच बेजबाबदार कारभारामुळे महसूल विभागाची व शासनाची प्रतिमा जनमाणसात मलीन होत असल्याबाबतच्या तक्रारी देखील जिल्हास्तरावर प्राप्त होत्या. त्यामुळे त्यांच्यावर विभागीय चौकशीची कारवाई करण्याच्या अधिनतेने निलंबनाची कारवाई करण्यात येत असल्याचे आदेशात नमूद आहे.निलंबन कालावधीतील मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे असेल व त्यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या पूर्व संमतीशिवाय मुख्यालय सोडता कामा नये, असे आदेश देखील महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव प्रवीण पाटील यांच्या आदेशान्वे देण्यात आलेले आहेत.

# तुरीचे दर पुन्हा घसरले; ७३५० रुपयांनी खरेदी

## शासकीय खरेदीचे अद्यापही आदेश नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



मागील आठवड्यात तुरीच्या दरात घसरण झाली असता या आठवड्यात ७५५० वर दर पोहचले होते. परंतु दरात पुन्हा घसरण झाल्याने शेतकरी चिंतेत पडले आहेत. बुधवारी बाजारपेठेत ६९०० ते ७३५० दराने तुरीची खरेदी करण्यात आली. दुसरीकडे शासकीय खरेदीकरिता नोंदणी सुरू असली तरी खरेदीबाबत अद्यापही शासनाकडून सूचना प्राप्त झाल्या नाही.

रब्बीमध्ये तुरीची शेतकऱ्यांना आशा असताना बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात आवक देखील वाढली आहे. शासनाकडून तुरीचे शासकीय दर निश्चित झाले आहेत. याकरिता नोंदणीची प्रक्रिया देखील सुरू आहे. परंतु शेतकऱ्यांना आर्थिक चणचण सुरू असल्याने याचा फायदा घेत व्यापाऱ्यांनी तुरीची खरेदी सुरू केली आहे. बाजारपेठत मागील आठवड्यात ६५०० पासून तर ६८०० वर तुरीला दर मिळाले. मात्र, या आवठड्यात दरामध्ये उच्चांकी मिळाल्याने शेतकरी सुखावला.७१०० ते ७५०० रुपये दराने मंगळवारपर्यंत तुरीची खरेदी करण्यात आली. परंतु, बुधवारी तीनशे रुपयांनी दर पुन्हा घसरले. शासकीय खरेदीअभावी आधीच सरासरी तीनशे ते चारशे रुपयांचे नुकसान शेतकऱ्यांना होत असताना यामध्ये पुन्हा ३०० रुपयांची भर पडली आहे

# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ लेखी परीक्षेच्या पर्यायी परीक्षेचे वेळापत्रकात जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ संलग्नित पाचही जिल्ह्यांच्या महाविद्यालयांमधील क्रीडा, सांस्कृतिक, आविष्कार, आव्हान, उत्कर्ष इत्यादी स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या व विद्यापीठाच्या संबंधित अधिका-यांनी प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यापीठीय पर्यायी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर करण्यात येत असून वेळापत्रकानुसार दि. १ मार्च, २०२५ पासून पुढे दिलेल्या परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येणार आहे.

अमरावती जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची परीक्षा विद्याभारती महाविद्यालय, अमरावती (१२६), अकोला जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२०५), बुलडाणा जिल्ह्यातील जी.एस. महाविद्यालय, खामगांव (३०१), यवतमाळ जिल्ह्यातील अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ (४०१), वाशिम जिल्ह्यातील आर.ए. महाविद्यालय, वाशिम (७०१) तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमांकरीता विद्यार्थ्यांच्या हिवाळी-२०२४ परीक्षेच्या प्रवेश पत्रावर नमूद केलेले परीक्षा केंद्र राहतील. सदर विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२४ परीक्षेकरीता देण्यात आलेले परीक्षा क्रमांक व प्रवेश पत्र पर्यायी परीक्षेकरीता कायम राहतील.



तसेच वेळापत्रक व परीक्षा केंद्रनिहाय रोललिस्ट विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, केंद्राधिकारी, महाविद्यालये, परीक्षा केंद्रांना कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता त्यांचेशी ९८५००४२३५७ या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी घेतले अंबादेवीचे दर्शन....



विभागीय आयुक्त श्रीमती श्वेता सिंघल यांनी आज सकाळी श्री अंबादेवीचे दर्शन घेतले .यावेळी संस्थानचे विश्वस्त अ‍ॅड राजेंद्र पांडे , श्री अशोक खंडेलवाल, तहसीलदार श्री लोखंडे उपस्थित होते . संस्थानतर्फे अ‍ॅड राजेंद्र पांडे यांनी त्यांचे स्वागत व सत्कार केला.

# 'गोड खिचडी झाली कडू' शाळा समितीच्या माध्यमातून दिली जबाबदारी

## शालेय पोषण आहाराचा मेनू बदलल्याने आली पंचाईत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



शिक्षकांना ३४ प्रकारची अशैक्षणिक कामे करावी लागतात. त्यात आता राज्य शासनाच्या नव्या फतव्यामुळे शाळा समितीच्या सहायाने घरोघरी साखर गोळा करण्याची वेळ आली आहे.

**राजेश सावरकर(राज्य प्रसिद्धी प्रमुख)**

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील पात्र शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. मात्र २८ जानेवारी २०२५ रोजी राज्य शासनाने पोषण आहाराच्या मेनूमध्ये बदल केले. यात गोड खिचडीसाठी लागणाऱ्या साखरेसाठी शासनाकडून निधी दिला जाणार नाही, असे स्पष्ट मत नमूद केले. ही साखर शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून लोकवर्गणीतून गोळा करावी, असा भन्नाट सल्लाही देण्यात आलेला आहे. ही 'गोड खिचडी कडू' झाल्यासारखी वाटत आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि अनुदानित शाळांमध्ये गरीब कुटुंबातील मुले शिक्षण घेतात. बरेच पालक दररोज उदरनिर्वाहासाठी मोलमजुरी करतात, अशा परिस्थितीत साखर गोळा करून गोड खिचडी बनविणे हास्यास्पद आहे.

**मेनूमध्ये नवनवीन बदल**

पोषण आहाराच्या मेनूमध्ये नवनवीन अन्नपदार्थांचा समावेश करून विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जात आहे. सामान्यतः परिस्थितीनुसार विद्यार्थ्यांना ठरलेल्या अन्नाची आवड झालेली असते. त्यामुळे ते नवीन बदल स्विकारीत नाही.

**साखर विकत घेण्याची वेळ**

गरीब कुटुंबातील मुले जिल्हा परिषदेच्या शाळांमधून शिक्षण घेत आहेत. शासनाच्या अफलातून निर्णयाने पालकांच्या खांद्यावर साखर विकत घेऊन शाळेला देण्याची वेळ अशा कुटुंबावर आली आहे.

# लाडकी बहीण योजनेचा फटका? अर्थखात्याकडून विविध विभागाच्या खर्चाला कात्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३ मुंबई**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा फटका राज्यातील इतर योजनांना बसतोय की काय असं चित्र आहे. त्याला कारण म्हणजे अर्थखात्याने विविध खात्यांना दिलेल्या सूचना. एकूण वार्षिक तरतुदीच्या ७० टक्केच निधी खर्च करण्यात यावा अशा सूचना अर्थखात्याने दिल्या आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या वित्त विभागाचा सन २०२४-२५ सुधारित अंदाजपत्रक निश्चित करण्यात आलं आहे. त्यामुळे अर्थखात्याकडून राज्यातील विविध विभागांना किती निधी खर्च करण्यात यावा संदर्भात अनुमान घालून देण्यात आलं. या ७० टक्क्यांपैकी निवृत्ती वेतन, शिष्यवृत्ती आणि विद्यावेतन, सहायक अनुदानित वेतन, कर्ज रक्कम, कर्जाची परतफेड आणि अंतरलेखा हस्तांतरे या विभागांना १०० टक्के निधी हा खर्च करता येणार आहे.

# अचलपूर बाजार समिती सभापतिपदाची २१ ला निवडणूक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अचलपूर**




स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती पदाकरिता अखेर मुहूर्त सापडला असून २१ फेब्रुवारी रोजी बाजार समितीमध्ये सभापती पदाकरीता निवडणूक होणार असल्याची माहिती सहाय्यक निबंधक परेश एन. गुल्हाने यांनी दिली. राजेंद्र गोरले यांनी सभापतीपदाचा राजीनामा दिल्याने सदर पद रिक्त झाले आहे.

डीडीआर शंकर कुंभार यांनी सभापतीपदाची निवडणूक घेण्यासाठी सहाय्यक निबंधक अचलपूर यांना एका आदेशाद्वारे अध्यासी अधिकारी म्हणून प्राधिकृत केले आहे. त्यामुळे सदर निवडणुकी संदर्भात सर्व कामकाज गुल्हाने पाहणार आहे. येथील रिक्त पदाचाअहवाल पाठविण्यासाठी उपसभापती अमोल चिमोटे यांच्या अध्यक्षतेखाली बाजार समिती संचालकांची तातडीची सभा बोलावण्यात आली होती. त्या अनुषंगाने डीडीआर कार्यालयाला रिक्त पदाचा अहवाल पाठविण्यात आला. सदर अहवाल प्राप्त होताच डीडीआर शंकर कुंभार यांनी दिनांक ११ फेब्रुवारी रोजी दिलेल्या एका आदेशाद्वारे सदर निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी अध्यासी अधिकारी म्हणून परेशगुल्हाने यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे. सभापती राजेंद्र गोरले यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर सहकार क्षेत्रात वादळ निर्माण झाले होते. बाजार समितीतील १३ संचालकांनी गोरले यांना पायउतार करण्यासाठी अत्यंत गोपनीयतेने रणनीती आखली होती. त्या अनुषंगाने १३ संचालकांनी एकत्र येत डीडी आर शंकर कुंभार यांना पत्र दिले होते. मात्र गोरले यांनी अविश्वास आणण्यापूर्वी सभापतीपदाचा त्याग केला. सभापती होण्यासाठी बाजार समितीमध्ये काहीजण चांगलेच उत्सुक असल्याचे चर्चेतून बोलले जात आहे. मात्र सभापतीपदाची माळ नेमकी कोणाच्या गळ्यात पडेल हे निवडणुकीच्या दिवशीच समजेल. नवीन सभापती निवडीसाठी बबलू देशमुख यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# शिवशाही बस होणार बंद, आता पुन्हा एशियाड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**




वाढत्या अपघातांमुळे नेहमीच चर्चेत राहिलेल्या शिवशाहीमुळे एसटी महामंडळाची डोकेदुखी वाढल्याने प्रवासी सेवेत फेल ठरलेल्या या शिवशाही बसला अखेरची घरघर लागली आहे. या गाड्यांची सेवा आता बंदच केली जाणार असून, पुनर्बाधणी करण्यात आल्यानंतर या शिवशाही बस लालपरी अथवा हिरकणी (एशियाड) म्हणून धावणार आहेत. आश्चर्याची गोष्ट म्हणजे महामंडळाने शिवशाहीसाठी लोकप्रिय एशियाडला इतिहासजमा केले होते. आता पहिल्या टप्प्यात १०० शिवशाही बस हिरकणी म्हणजेच एशियाड बसमध्ये रुपांतरित होणार आहेत.

साध्या गाडीत रुपांतर करण्यासाठी शिवशाहीमधील वातानुकूलित यंत्रणा काढून टाकण्यात येणार असून, अंतर्गत बदलांसह रंगसंगती देखील बदलण्यात येणार आहे. शिवशाहीचे रुपांतर लालपरी अथवा हिरकणी बसमध्ये केल्यानंतर तिकीट दरात देखील बदल होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे शिवशाही इतिहासजमा होऊन पुन्हा एशियाड अवतरणार याबद्दल परिवहन मंत्री प्रताप सरनाईक अनभिज्ञ असल्याचे दिसते. ते म्हणाले, शिवशाहीचे एशियाडमध्ये रुपांतर करण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप माझ्याकडे आलेला नाही. परंतु शिवशाहीचे अपघात, प्रवाशांच्या तक्रारी असतील आणि शिवशाहीचे एशियाडमध्ये रुपांतर करण्याचा निर्णय प्रवासीभिमुख असेल तर त्याचा नक्कीच विचार केला जाईल. महामंडळाच्या ताफ्यात सध्याच्या घडीला स्वमालकीच्या ७९० शिवशाही (वातानुकूलित ) आहेत. त्यापैकी निम्म्या बस प्रवासी सेवेत असून उर्वरित बस नादुरुस्त अवस्थेत एसटीच्या विविध कार्यशाळांमध्ये उभ्या आहेत. शिवशाही बस सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात आहेत. या गाड्यांमध्ये वारंवार तांत्रिक दोष आढळून आले आहेत. साध्या बसच्या तुलनेत शिवशाहीच्या अपघातांचे प्रमाण देखील जास्त आहे. या बस जुन्या झाल्या असून त्या रस्त्यातच बंद पडतात. खडखड आवाज ऐकू येतो. वातानुकूलित यंत्रणा बंद असते. शिवाय शिवशाहीचा वेगही तसा मंदच आहे. अशा तक्रारी वारंवार प्रवाशांनी महामंडळाकडे केल्या आहेत. परिणामी, सुरुवातीपासूनच प्रवाशांच्या पसंतीला न उतरलेली शिवशाही बस लवकरच एसटीच्या ताफ्यातून इतिहासजमा होईल.

# आपले सरकार सेवा केंद्रातील चालकांवर उपासमारीची आली वेळ

## चार महिन्यांपासून मानधनच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



ग्रामविकास व माहिती तंत्रज्ञान विभागांतर्गत 'आपले सरकार' प्रकल्पाच्या माध्यमातून ग्रामपंचायत स्तरावर मागील ११ वर्षापासून केंद्र चालक कार्यरत आहेत. मात्र केंद्र चालकांना वेळेवर मानधन मिळत नाही. मागील चार महिन्यांपासून त्यांना मानधन न मिळाल्याने त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून मानधन अभावी त्यांच्या कुटुंबीयावर उपासमारीची वेळ आली आहे.संग्राम व आपले सरकार या दोन प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर राज्यातील आपले सरकार सेवा केंद्र चालक काम करत आहेत. आपले सरकार प्रकल्पात काम करणाऱ्या केंद्र चालकांवर नेहमी अन्याय करण्यात येत असल्याचे बोलले जात आहे. ग्रामविकास विभागाने १४ जानेवारी २०२१ रोजीच्या शासन निर्णयातघेतलेल्या निर्णयानुसार अगोदर असलेल्या तुटपुंज्या सहा हजार रूपये मानधनात चार हजार रुपये वाढ केली. आज महागाईच्या काळात १० हजार रूपयांच्या मासिक मानधनात संगणक परिचालकांना गुजरान करावी लागते.

**केंद्रचालकांवर कामाची सक्ती**

केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची ग्रामीण पातळीवर केंद्र चालकांच्या मार्फत अंमलबजावणी करण्यात येते.कोरोनाच्या काळातही केंद्र चालकांनी शासनाला मोलाची मदत केली. पीएम किसान सन्मान योजना असो वा सध्या सुरू असलेली अ‍ॅग्रीस्टॅक योजना व शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनेच्या कामाची केंद्रचालकावर सक्ती करण्यात येते. मात्र शासनाकडून नेहमीच केंद्रचालकाची उपेक्षा केली जात आहे.

# अमरावती जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थाचा संघ अध्यक्षपदी माधव शेंडे तर उपाध्यक्षपदी साहेबराव माकोडे अविरोध निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३धामणगाव रेल्वे**



अमरावती जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्थाचा संघ निवडणूकित अध्यक्षपदी माधव शेंडे तर उपाध्यक्षपदी साहेबराव माकोडे यांची अविरोध निवड झाली आहे

जिल्ह्यातील मजूर सहकारी संस्थाच्या सर्वांगीण विकास व उभारी देण्यासाठी दि जिल्हा मजूर कामगार संघाचा नेहमी पुढाकार असतो या संघाची निवडणूक निरीक्षक राजेश यादव व माजी अध्यक्ष तनवीर सादिक काज़ी यांच्या नेतृत्वात पार पडली यात अविरोध अध्यक्षपदी माधव शेंडे,तर उपाध्यक्षपदी साहेबराव माकोडे यांची निवड झाली यावेळी संचालक नंदकिशोर मोहोड, गुलाम राजीक खान सादुल्ला खान, अझर खा हबीब खा, स्वप्नील भुयार, राजकन्या काळे, तरन्नुमनीसा मोहम्मद नईम शेख, हिरुजी हेकडे, अशोक दूधंडे तज्ञ संचालक राजू मुधडा उपस्थित होते यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून राजेश यादव व राहुल पुरी उपस्थित होते.

# प्राची पालकर सुवर्णपदकाच्या मानकरी : चार विद्यार्थांना रजत पदक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**



श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीद्वारा संचलित श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाने यावर्षी सुद्धा आपली उत्तम निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. एम.ए.जे. एम. सीच्या विद्यार्थिनी प्राची पालकर - बोरगावकर यांनी प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक पटकावले आहे. याच वर्गातील विशाल बोरे आणि पूजा जायले हे विद्यार्थी अनुक्रमे दुसर्या आणि तिसर्या क्रमांकसह रजत पदकाचे मानकरी ठरले आहेत. बी.ए. जे. एम.सी चे अंकिता बाबरे आणि शंतनु शेरेकर यांनी अनुक्रमे दुसर्या व तिसर्या क्रमांकासह रजत पदक मिळविले आहे.

त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास कुलट तथा पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. कुमार बोबडे यांच्यासह प्रा. गजानन गडेकर, प्रा. प्रतीक करंडे, प्रा. रुपेश फसाटे, प्रा. मनीष भंकाळे, प्रा. डॉ. नकुल धरमकर, प्रा. शिवकुमार साबळे, प्रा. मनीषा देशमुख, प्रा. सर्वेश मराठे, शाम पिंजरकर यांनी अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. दरवर्षीच महाविद्यालयाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे विद्यार्थी उत्तम कामगिरी करतात. या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी विविध ठिकाणी कार्यरत आहे. कोणी जनसंपर्क अधिकारी म्हणून तर कोणी पत्रकार म्हणून वेगवेगळ्या वृत्तपत्रांमध्ये कार्य करीत आहे.

# कॉटन मार्केट परिसरात आग ....



अमरावती शहरातील कॉटन मार्केट परिसरात असलेल्या दुकानांना आज दुपारच्या सुमाराच अचानक आग लागली या वेळी या ठिकाणी गोधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. घटनेची माहिती अग्निशमन विभागाला माहिती होताच संपूर्ण पथक त्या ठिकाणी पोहचले व आगीवर नियंत्रण मिलविले या आगीत व्यापाराच्या दुकानांत असलेल्या कांदे,बटाटे आगीत जळून कोळसा झाले.

# सख्या बहिणींनी रचला इतिहास; पोलिस खात्यात दोघींची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३हिवरखेड**



कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर हिवरखेड, ता.मोर्शी येथील दोन सख्या बहिणींनी पोलीस दलात स्थान मिळवत गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. आरती रामकृष्ण बंदे यांनी २०२३ मध्ये तर पूजा रामकृष्ण बंदे यांनी २०२५ मध्ये पोलीस भरती परीक्षा उत्तीर्ण करत यश मिळवले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत त्यांनी मिळवलेले हे यश गावासाठी अभिमानास्पद आहे. या बहिणींचे वडील लोहारकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई गृहिणी आहे. त्यांचा एकुलता एक भाऊ सध्या शिक्षण घेत आहे. घरची आर्थिक परिस्थिती तशी साधी असली तरी या दोघींनी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर आपले स्वप्न साकार केले. कोणतीही विशेष सुविधा नसतानाही त्यांनी पोलीस भरती परीक्षेसाठी अपार मेहनत घेतली.

पोलीस भरती परीक्षेत यश मिळवण्यासाठी शारीरिक आणि लेखी चाचण्या पार कराव्या लागतात. त्यामुळे या दोन्ही बहिणींनी कठोर मेहनत घेतली. पहाटे लवकर उठून व्यायाम, धावणे आणि शारीरिक तंदुरुस्तीवर भर दिला. त्याचबरोबर दिवसभर अभ्यास करून लेखी परीक्षेचीही तयारी केली. सातत्यपूर्ण प्रयत्न, आत्मविश्वास आणि चिकाटी यांच्या जोरावर त्यांनी हा टप्पा पार केला. दोन्ही बहिणींच्या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामस्थ, शिक्षक आणि नातेवाईक त्यांचे भरभरून कौतुक करत आहेत. आमच्या मुलींनी कठीण परिस्थितीतही हार न मानता पोलीस दलात स्थान मिळवले, याचा आम्हाला खूप अभिमान आहे, असे त्यांच्या आई-वडिलांचे म्हणणे आहे.परिस्थिती कितीही कठीण असली तरी मेहनतीला पर्याय नाही. सातत्याने प्रयत्न केल्यास यश नक्की मिळते, असा संदेश या यशस्वी बहिणींनी दिला आहे. त्यांच्या यशाने गावातील तरुणांना आणि विशेषतः मुलींना नवी प्रेरणा दिली आहे. हिवरखेडसारख्या ग्रामीण भागातून दोन सख्या बहिणींनी पोलीस दलात भरती होणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या संघर्षाच्या आणि यशाच्या प्रवासामुळे गावातील अनेक विद्यार्थ्यांना नवीन प्रेरणा मिळाली असून, त्यांनी मेहनतीचा नवा आदर्श घालून दिला आहे.